मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

मप्र

# हितगुज

अंक ५५ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● सप्टेंबर २००३

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## सेल, फेस्टिवल ऑफर्स, फ्री गिफ्ट्स् यांना भुलू नका

- **सौ. राधा श्रीकांत** (पृ.३७८), अंधेरी मुंबई. ग्राहक पंचायतच्या क्रियाशील कार्यकर्त्या (फोन २६३०४५२२)

दिवाळी तोंडावर आलीच की! घरोघरी दिवाळीच्या कामांचे, साफ-सफाईचे, फराळाच्या पदार्थांचे आणि हो, खरेदीचे सुद्धा वेध लागले असतील. आजची गृहिणी आणि एकूणच सगळे खरेदीदार अगदी जागरूकतेने खरेदी करतात. पण सेलच्या, गिफ्ट ऑफरच्या प्रलोभनांना बळी न पडण्याचा सावधपणा दाखवणं अजून तितकसं जमत नाही आपल्याला.

या सुमाराला पुष्कळांच्या हातात बोनसचा पैसा आलेला असतो. काहीतरी खरेदी करण्यासाठी हात शिवशिवत असतात. त्यात दिवाळीचा मूड असतोच. आणि नेमक्या याच गोष्टींचा फायदा व्यापारी वर्ग घेत असतो. चहुबाजूंनी वेगवेगळ्या 'ऑफर्स' आपल्या अंगावर अक्षरशः कोसळत असतात. स्टॉक क्लिअरन्स सेल, स्पेशल फेस्टीव्ह ऑफर, दुकानाच्या नूतनीकरणाच्या निमित्ताने सेल. कारणे शंभर पण लक्ष्य एकच. गिऱ्हाइकांना आकर्षित करून घेणे.

इथेच आपली खरी कसोटी असते. आपल्याला नेमकं काय घ्यायचं आहे, आपले बजेट काय आहे याची स्पष्ट रूपरेषा आपल्या मनात तयार नसेल तर आपण फशी पडायला अजिबात वेळ लागत नाही आणि अनावश्यक, कुचकामी वस्तूंची खरेदी केली जाते.

फ्रीज, टी.व्ही., फर्निचर यांसारख्या मोठ्या वस्तूंची किंवा मिक्सर, फूड प्रोसेसर यांसारख्या स्वयंपाकघरात लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करताना तर फ्री गिफ्ट ऑफरला हमखास बळी पडणारा एक वर्ग आहेच आपल्यात. चार दुकानांत जाऊन, वस्तूच्या तांत्रिक बाजूची संपूर्ण माहिती गोळा करून ती आपल्या गरजेशी, खिशाशी ताडून पाहून, विक्रीपश्चात सेवेबाबत किंवा वॉरंटी-गॅरंटीबाबत नीट चौकशी करून मगच नेमक्या दुकानात जाऊन खरेदी करण्याचा सूज्ञपणा आपण दाखवला पाहिजे.

एक अनुभव सांगू का? मी दोन वर्षांपूर्वी नवा फ्रीज घेतला. त्या फ्रीजसोबत एक कॅमेरा गिफ्ट होता. मी कॅमेरा नाकारला (कारण घरात एक बरासा कॅमेरा आधीपासून होताच.) आणि त्या बदल्यात फ्रीजची किंमत चांगली पाच हजारांनी कमी करून घेतली.

घासाघीस करायला बिचकणाऱ्या मंडळींसाठी महत्त्वाचा कानमंत्र! मोठ्या दुकानात सुद्धा खरेदीदार घासाघीस करतात. अगदी कार घेतांना सुद्धा तिची किंमत काही हजारांनी कमी करून घेता येते. पण त्यासाठी न बिचकता, न संकोचता विक्रेत्याशी बोलले पाहिजे. नाहीतर कवीवर स्व. वसंत बापटांनी म्हटल्याप्रमाणे -

**आकाशवाणी घटवत असते,**
**दूरदर्शन पटवत असते।**
**जहांबाज जाहिरातशाही**
**गिऱ्हाइकांना गटवत असते।।**

खरेदीदारा, सावध रहा - नाहीतर यातले 'गटणारे गिऱ्हाईक' आपणच ठरू! ***

### अखिल भारतीय अधिवेशन

**मराठे प्रतिष्ठानच्या पुण्यात डिसेंबरमधे होणाऱ्या सातव्या अधिवेशनाचे निमंत्रण, कार्यक्रम यांसाठी पृ.८,९ पहावे.**

मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

अध्यक्षांच्या सोयीच्या दृष्टीने (आणि अन्य कोणाचीच यांत गैरसोय नसल्याने) आता **महिन्याच्या दुसऱ्याऐवजी पहिल्या शनिवारी कार्यकारी मंडळाची सभा** घेण्याचे ठरविण्यात आले आहे. सभेच्या दिवशी सायंकाळी ५ वाजता कोणीहि कुलबांधव कार्यकारी मंडळाला भेटण्यास येऊ शकतो.

मागील तिमाहीत जून १४, जुलै ७ व १९ आणि ऑगस्ट ९ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. याच कालावधीत श्री. सी. गो. खांबेटे, श्री. भाऊ मराठे तसेच ल. शं. मराठे यांनी त्यांच्या अन्य कारणासाठीच्या पुणे भेटीत पुण्यातील कार्यकर्त्यांशी आगामी अधिवेशनसंबंधी अनौपचारिक चर्चा केली. शेवटी २५/२६ ऑगस्ट रोजी कार्यवाह वि. के. मराठे, कोषाध्यक्ष सी. गो. खांबेटे आणि संमेलन सांस्कृतिक कार्यक्रम नियोजक/निवेदक भाऊ मराठे यांनी संयुक्तपणे पुण्यात जाऊन पुण्यातील कार्यकर्त्यांच्या सभेत एकत्रित चर्चा करून मराठे प्रतिष्ठानच्या डिसेंबरातील अधिवेशनाचा कार्यक्रम व अन्य तपशील निश्चित करण्यात आला.

**केबल भाडे केवळ ११० रुपये**
**दिवाणी न्यायालय निर्णय**

मुंबईत कुलाबा ते सायन-माहीम भागात एक सप्टेंबरपासून (कागदावर) कॅस लागू झाली आहे. ज्या केबल ग्राहकांनी सेट टॉप बॉक्सचा पर्याय नाकारला आहे, त्यांना नि:शुल्क वाहिन्या करांसह एकूण सुमारे एकशे दहा रुपयात दाखवणे केबल ऑपरेटरवर बंधनकारक आहे. पण मुंबईतील एका वकीलानी दाखल केलेल्या याचिकेवर **दिवाणी न्यायालयाने नुकताच निकाल दिला आहे की ज्या भागात कॅस लागू नाही त्या भागातही ग्राहकांना केवळ एकशे दहा रुपयेच आकारणे केबल ऑपरेटरांवर बंधनकारक आहे.**

पूर्वीइतकेच पैसे द्या नाहीतर कनेक्शन कापू अशी भाषा करणाऱ्या ऑपरेटर्सना कसा धडा शिकवायचा ते आता आपणच ठरवायचे आहे. -

सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे।
परंतु तेथे एकतेचे अधिष्ठान पाहिजे।।
(समर्थांची क्षमा मागून)

**- सौ. राधा श्रीकांत** (पृ.३७८), अंधेरी मुंबई.
ग्राहक पंचायतच्या क्रियाशील कार्यकर्त्या

**अनुकरणीय**

आपल्या संस्थेच्या अहमदाबादमधील १२ वर्गणीदारांचे पोस्टेज वाचवण्यासाठी मी आपणास रु. २२५ पाठवीत आहे. प्रत्येकी ४।।रु. प्रमाणे १।वर्षाचा टपालखर्च भागेल. हे संपल्यावर मी परत पाठवीन. लहानमोठ्या शहरातून असा खर्च वाटून घेतला तर हितगुजचा भार हलका होईल.

**- प्रकाश गणेश विद्वांस** (पृ.६४५),
अहमदाबाद

*आपल्याकडे लीडर्स कमी फॉलोअर्स जास्त म्हणतात आपण 'लीड' दिला आहे. फॉलोअर्सची प्रतीक्षा आहे.* ***- संपादक***

**पुणे अधिवेशन**

पुणे अधिवेशन २२/१२ रोजी सायं. ५ पासून सुरू होऊन २४/१२ रोजी सायं. ८ पर्यंत संपेल. **कार्यक्रम स्थळ पूर्वपरंपरेनुसार शशिकांत मराठे यांचे ज्ञानेश्वर मंगल कार्यालय.** खान-पान, चर्चा, सभा सर्व तिथेच. **माणशी अवघ्या २०० रुपयांत.**

परगावच्या लोकांची राहण्याची व्यवस्थाहि तिथेच होणार आहे. मर्यादित लोकांसाठी स्वतंत्र खोल्यांमधे गटागटाने व्यवस्था होईल. त्याचबरोबर मोठ्या हॉलमधे सामुदायिक सहनिवासाच्या सोयीचा फायदा घेऊन 'काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम' या पंडितवचनाचा आगळा वेगळा प्रत्यक्षानुभव घेण्याची सुवर्णसंधीहि कुलबांधवांना मिळणार आहे. संमेलनाचे निमंत्रण, संयोजकांचे आवाहन, कार्यक्रमाचा तपशील इ. स्वतंत्रपणे दिलेले आहेच. (पहा पृ.८,९)

या संमेलनाचे एक खास वैशिष्ट्य मुद्दाम नमूद करायला हवे. मराठ्यांचे कला - साहित्य - संगीत - औद्योगिक - व्यावसायिक उपक्रम आणि उत्पादने यांची माहिती कुलबांधवांना व्हावी म्हणून जसे प्रयत्न होणार आहेत त्याचप्रमाणे आपले एक कुलबांधव हेमंत महादेव, विलेपार्ले यांच्या सहकार्याने निकोलस पिरॅमल आणि प्रॉक्टर अँड गँबल-पॅटीन या फार्मास्युटिकल्स आणि सौंदर्यप्रसाधने उत्पादन करणाऱ्या नामवंत कंपन्यांच्या सौजन्याने कुलबांधवांना **बोन मिनरल डेन्सिटी मापन आणि हेअर केअर ॲडव्हाइस** या दोन महागड्या सेवा **विनाशुल्क** (अथवा अत्यल्प शुल्कांत) **संमेलनस्थळीच** उपलब्ध करून देण्याचेहि प्रयत्न चालू आहेत.

**मग आता वाट कशाची पाहता?**
**आज, आता, ताबडतोब -**

- संमेलनाला उपस्थित राहण्याचे निश्चित करा.
- आपण येणार असल्याचे संयोजकांना फोनवर **आणि** लेखी कळवा (संयोजकांनी अपेक्षिलेल्या प्रश्नावलीसह).

आणि हे सर्व ३१ ऑक्टोबर पूर्वी बर का! ***चला तर मग आता भेटूया संमेलनस्थळीच.*** **- संपादक** ***

एकमेकां साह्य करूं

**अत्यल्प भांडवलात व्यवसायाची सुवर्णसंधी**

स्विफ्टस् या मुद्रणयंत्र उत्पादन क्षेत्रांतल्या अग्रेसर कंपनीला ऑफसेट मशीनच्या विक्रीसाठी जिल्हावार कमिशन पद्धतीवर थेट विक्रेते नेमायचे आहेत. उमेदवार शक्यतो पदवीधर व शक्यतो मुद्रण क्षेत्राशी संबंधित असावा.

स्वत:च्या आणि असल्यास व्यवसायाच्या संपूर्ण माहितीसह **ताबडतोब** खालील पत्त्यावर अर्ज पाठवावा.

जनरल मॅनेजर, मार्केटिंग, स्विफ्टस् लिमिटेड, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

(समान पात्रतेच्या उमेदवारांमधे कुलबांधवांचा प्राधान्याने विचार केला जाईल.)

Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

मानसन्मान

### डोंबिवली बँकेच्या अध्यक्षपदी अरविंद दामोदर

प्रतिष्ठानचे अध्यक्ष **अरविंद दामोदर** (पृ.२९२), डोंबिवली, याची डोंबिवली नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून १४-८-०३ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत सर्वानुमते निवड करण्यात आली.

### प्रभाकर गणेश यांना लाईफटाईम अचिव्हमेंट ॲवॉर्ड

नवी दिल्ली येथील इंटिग्रेटेड कौन्सिल फॉर सोशियोइकॉनॉमिक प्रोग्रेस या संस्थेतर्फे आपले **पुण्यांतले कुलबांधव प्रभाकर गणेश** (पृ.६१) यांना राष्ट्रपति डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या उपस्थितीत बंगलोर येथे दि. २९ में २००३ रोजी Lifetime Achievement Award in recognition of outstanding service and matches contributions to the progress of the Nation प्रदान करण्यात आले.

शिक्षण, उद्योग, सार्वजनिक सेवा, राजकारण, इंजिनिअरिंग-संशोधन, नवनिर्मिती, कला इ. विविध क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्यांना हे पारितोषिक दिले जाते. यासाठी चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंस्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, I.S.I., IDBI, ICICI, State Financial Corporations, Industrial Promotion Councils इ. विविध क्षेत्रांतल्या संस्थांकडून शिफारशी मागवून त्यामधून अंतिम निवड केली जाते.

**प्रभाकर गणेश** यांनी विविध इंजिनिअरिंग कंपन्यात काम करून त्या तोट्यांतून नफ्यांत आणल्या. टुथ ब्रशाच्या केसांची टोके राऊंडिंग करण्याच्या यंत्रांत सुधारणा करून मिनिटाला ३२ टुथ ब्रश निर्माण करणारे मशीन भारतात बनविले व त्यामुळे अशा यंत्रांची आयात थांबून परदेशी चलन वाचले. परदेशांतील कंपन्याही हे यंत्र वापरू लागल्या.

तसेच महाराष्ट्र सरकारच्या 'मिटकॉन' या संस्थेचे सल्लागार म्हणून नवीन उद्योग उभारणी, आधुनिकीकरण, आजारी उद्योगांचे पुनरुज्जीवन, कुष्ठरोग्यांसाठी उद्योग व प्रशिक्षण केंद्राची उभारणी, आर्थिक दृष्ट्या दुर्बल व्यक्तींसाठी उद्योग प्रशिक्षण केंद्रांची उभारणी इ. प्रकल्प राबवले.

तसेच दादरमधील गणेश मंडळामार्फत स्वखर्चाने सतत १२ वर्षे योगासने व सूर्यनमस्कार यांच्या प्रसारासाठी प्रोत्साहन पारितोषिके दिली.

प्रभाकर गणेश यांची ही कामगिरी कुलबांधवांना नक्कीच अभिमानास्पद आहे. सर्व कुलबांधवांतर्फे त्यांचे खास अभिनंदन.

### ग्राहकांसमोरच दागिने घडवणारी पेढी

ठाणे येथील **वामन शंकर मराठे ज्वेलर्स, मोती शोरूमने** आता ग्राहकांकडील जुन्या हिऱ्या-मोत्यांच्या दागिन्यांचे काम त्यांच्यासमोरच करून देण्याचा नवा उपक्रम सुरू केला आहे.

जुन्या पिढीतील अनेक ग्राहकांकडे त्या वेळचे हिरे आणि मोती आहेत. या मौल्यवान हिऱ्या-मोत्यांचे मूल्य असाधारण असल्याचा विश्वास त्यांच्या मनामध्ये असतो. त्यांच्या या विश्वासाला तडा जाऊ न देता मनपसंत काम व्हावं, त्यांच्या मनात शंका येऊ नये यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

(सौजन्य: महाराष्ट्र टाईम्स, १७.२.२००३)

### १२वीत मुंबई बोर्डात ५वा सुकृत खांबेटे

विलेपार्ले, मुंबई येथील सदस्य **विनायक कृष्णाजी खांबेटे (पृ.६९४) यांचा मुलगा सुकृत** याने फेब्रुवारी २००३ मधे झालेल्या १२वी (शास्त्र) परीक्षेत ९४.२६ टक्के गुण मिळवून **मुंबई बोर्डात गुणवत्ता यादीत ५वा** क्रमांक व पार्ले टिळक विद्यालयांत १ला क्रमांक पटकावला. सुकृतचे सर्व कुलबांधवांतर्फे खास अभिनंदन.

### १२वीत मुंबई बोर्डात ११वा हर्षद आठवले

प्रतिष्ठानच्या सभासद **सौ. स्नेहल प्रसाद आठवले** (सदाशिव गोविंद, पृ.८७ यांची मुलगी) **यांचा मुलगा हर्षद** याने फेब्रुवारी २००३ मधे झालेल्या **१२वी कॉमर्स** परीक्षेत ८७ टक्के गुण मिळवले. **मुंबई बोर्डात** त्याने गुणवत्ता यादीत **११वा क्रमांक** पटकावला. हर्षदच्या उज्ज्वल यशाबद्दल सर्व कुलबांधवांतर्फे अभिनंदन.

### १२वीत कोल्हापूर बोर्डात २६वी अश्विनी दिनेश

कराडमधील कुलबांधव **दिनेश दत्तात्रय मराठे** (विद्वांस, पृ.६२०) **यांची मुलगी अश्विनी** हिला मार्च २००३ मधे झालेल्या १२वी शास्त्र परीक्षेत ९३.९७ टक्के गुण मिळाले. **कोल्हापूर बोर्डाच्या** गुणवत्ता यादीत तिने **२६वा क्रमांक** मिळवला, याबद्दल अश्विनीचे सर्व कुलबांधवांतर्फे अभिनंदन.

### चंद्रकांत वामन टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष

ठाणे येथील टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून आपले कुलबांधव **चंद्रकांत वामन (पृ.१००)** चार्टर्ड अकौंटंट यांची २००३-०६ अशा तीन वर्षासाठी निवड झाली आहे.

[illegible]

१) ठाणे येथील प्रतिष्ठानचे जुने कार्यकर्ते सभासद **सदाशिव गोपाळ जोशी (पृ७४२) यांचा मुलगा जितेंद्र** याचा विवाह पुण्यातील शिल्पा वसंत लेले हिच्याशी २०.७.२००३ रोजी थाटामाटात संपन्न झाला.

२) विरार, ठाणे येथील सभासद **सुरेश श्रीधर विद्वांस (पृ.६४८)** यांच्या दोन्ही मुलांचे विवाह झाल्याचे त्यांनी आजारपणामुळे उशीरा कळविले आहे.

**मोठा मुलगा संदीप** याचा विवाह नाशिक येथील अर्चना नानिवडेकर हिच्याशी २६ मे २००२ रोजी संपन्न झाला आणि

**धाकटा मुलगा सुबोध** याचा विवाह विलेपार्ले, मुंबई येथील मयुरी चित्रे हिच्याशी दि. ५ मे २००२ रोजी.संपन्न झाला.



Marathe Pratishthan

**सहवेदना**

१) पार्ले येथील सदस्य **विनायक कृष्णाजी खांबेटे (पृ.६९४) यांचे वडील कृष्णाजी अनंत** यांना १४.८.२००२ रोजी वांगणी (जि. ठाणे) येथे देवाज्ञा झाली.

२) **बेळगांवमधील प्रतिष्ठानचे सदस्य शाम यशवंत (पृ.५२५) यांची काकू श्रीमती लक्ष्मीबाई शंकर** यांचे १३ जून २००३ रोजी आजाराने निधन झाले. निधनसमयी त्या ८४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात जावई, मुलगी, नातू व नात असा परिवार आहे.

३) व ४) मराठे परिवाराचे **गोव्यांतील क्रियाशील सभासद कै. पांडुरंग दत्ताराम** (पृ.५३८) पर्वरी, यांचे दि. १३.६.०३ रोजी व **कै. लक्ष्मण पांडुरंग (पृ.५४३)** ऊर्फ बाबा मराठे, **खातोडे,** यांचे २७.६.०३ रोजी दु:खद निधन झाले. त्यांना 'श्रद्धांजली' वाहाण्यासाठी दि. १३.७.०३ रोजी सकाळी ठीक १० वाजता, श्री. अरुण मराठे, फोंडा यांच्या घरी 'शोकसभा' घेण्यात आली.

मा. श्री. **का. बा. मराठे** यांनी कै. पां. द. मराठे व कै. ल. पां. ऊर्फ बाबा मराठे यांच्या विषयीच्या हृद्य आठवणी सांगितल्या व त्यांचे कार्य पुढे सातत्याने चालू ठेवावे असे सूचित केले.

श्री. **मोरेश्वर मराठे** यांनी नात्यापेक्षा मैत्री व ओळख हीच श्रेष्ठ ठरते, या दृष्टिकोनातून काही आठवणी सांगितल्या.

श्री. **कृष्णा मराठे** यांनी दोघेही मराठे दिग्गजानी सुरू केलेले कार्य पुढे चालविणे हीच खरी 'श्रद्धांजली' होय असे मत मांडले. तसेच एखादी दु:खद घटना घडल्यास ज्याला प्रथम समजेल त्याने जितक्या मराठे कुटुंबियांना कळविता येईल तेवढ्यांना लगेच कळवावे. म्हणजे मदतीचा हात वेळेवर देता येईल असा महत्त्वपूर्ण विचार मांडला व 'श्रद्धांजलीचा' ठराव घेण्यात आला.

**वरील सर्व कुटुंबीयांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.**

***

# भारत - काल आणि आज

## (काल म्हणजे १९४७ पूर्वी व आज म्हणजे १९४७ नंतर)

- **विजय मराठे** (पृ.१५५), पुणे

काल स्वातंत्र्यासाठी लोकमान्य टिळक, बॅ. सावरकर ह्यांनी किती प्रयत्न केले व अंदमान मध्ये शिक्षा भोगताना काय हाल झाले हे वर्णन शब्दाने होऊ शकत नाही. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' अशी लो. टिळक ह्यांनी गर्जना केली व त्याला साथ दिली ती चाफेकर बंधू, कान्हेरे वगैरे सहकाऱ्यांनी. त्यांना पुढे फाशी झाली. त्याचवेळी भारत-पाकिस्तानच्या वाटाघाटी सुरू होत्या. सरदार वल्लभभाई पटेलांनी मुंबईत भाषण केले की सुईच्या अग्रावर राहील एवढी मातीसुद्धा पाकिस्तानला देणार नाही. पण दुसरीकडे पं. जवाहरलाल नेहरू, बॅ. जीना, लॉर्ड माऊंटबॅटन व लेडी माऊंट बॅटन ह्यांच्यात फाळणीची बोलणी सुरू होती. ह्याची फलश्रुती १५ ऑगस्ट १९४७ च्या काळ्याकुट्ट अमावास्येला झाली आणि हिंदुस्तान-पाकिस्तानाची निर्मिती झाली.

भारत स्वतंत्र झाल्यावर भारतात "राम राज्य" येणार अशी अंधश्रद्धा भारतीयात होती, पण लगेचच भारतात हिंदू-मुसलमान दंगे सुरू जाले ह्या दंग्याचे वर्णन करण्यासाठी शब्द अपुरे आहेत. पाकिस्तानात हिंदूना हाकलण्याचे जोरदार उठाव झाले. त्यांत अत्याचारांच्या आग डोंब उसळला. नवाखलीत दंगा झाला त्यात ज्या वेळी हिंदूंनी उठाव केला नाही तेव्हा प. पू. बापूजी (म. गांधी) नवाखलीत आमरण उपोषण करणार अशी घोषणा झाली व लगेच काही कोटींची मदत भारताने पाकिस्तानला द्यावी असेही सांगितले. ह्या भोगाला काय म्हणावे हेच समजत नाही.

भारतात निरनिराळी राज्ये स्थापन झाली पण प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बोकाळला आहे. कै. माडगूळकरांच्या गीताप्रमाणे 'लबाड झोडीती बंगले गाड्या, कुलवंताला मात्र झोपड्या' अशी परिस्थिती आहे. ग्रामपंचायती पासून वर पर्यंत भ्रष्टाचार बोकाळला आहे. लाच घेताना एका पो. इनस्पेक्टरने दुसऱ्या पो. इन्स्पेक्टरला पकडले. पुढे काय ? चौकशी चालू आहे वगैरे. पेपर फूट प्रकरणी मोठमोठी शिक्षण खात्याची मंडळी, पोलीस ऑफीसर सापडले. त्याची सुद्धा चौकशी चालू आहे. चौकशी पूर्ण झाल्यावर दोषी व्यक्तींना फंड, ग्रॅच्युटी पेन्शन वगैरे काही न देता सरळ शिक्षा संपल्यावर घरी पाठवावे. चौकशीच्या नावाखाली गुन्हा करणाऱ्याला खऱ्याचे खोटे करायला वेळ मिळतो.

खून, दरोडे, बलात्कार ह्याला प्रत्यक्ष पाहाणारा पुरावा नाही म्हणून आरोपी सहीसलामत सुटतो. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना प्रत्यक्ष पाहाणारा पुरावा कसा मिळणार ? अर्थात ह्या मागे सुद्धा भ्रष्टाचारच आहे. गुन्हेगाराला शिक्षा झाली तरच भ्रष्टाचार काही प्रमाणात कमी होईल. गृह खात्याने कायद्यात योग्य वाटल्यास बदल करावा.

आज काल कोणत्याही कार्यालयात 'वजना' शिवाय काम होत नाही व वजन ठेवले नाही तर साध्या कामाला हेलपाटे घालावे लागतात, ह्या गोष्टीकडे कार्यालयाच्या मुख्य अधिकाऱ्यानेच स्वत: भ्रष्ट न होता कडवी नजर ठेवावी व एकदा माणूस तक्रार घेऊन आला तर स्वत: ह्याची चौकशी करुन त्याच्या तक्रारीचे योग्य प्रकारे निवारण करावे व राम राज्याचे खरे स्वरूप जनतेपुढे ठेवावे. नाहीतर "कर्म करोनी म्हणती साधू ऐसे कैसे झाले भोंदू" ही अवस्था कायम राहील.

***

**SELF IMPROVEMENT**

- Be nice to the people on your way up; you might have to see them on your way down.
- Hope is the child of the unborn future; Ego is the lingering memory of the dead past.

Marathe Pratishthan

# कॅनेडीयन हुज हू २००२ मध्ये डॉ. एकनाथ व्यंकटेश

- **श्रीनिवास गोपाळ** (पृ.३८९), पुणे

आपले एक कुलबांधव **डॉ. एकनाथ व्यंकटेश मराठे** (पृ.३८९) हे १९५५ मधे कॅनडा येथे गेले आणि तेथेच स्थायिक झाले. त्यांनी तेथे डॉक्टरेट ही पदवी मिळविली आणि शिक्षण क्षेत्रांत व पर्यावरणासंबंधी बरेच कार्य केले. त्यांचे पुष्कळ पेपर्स प्रसिद्ध झाले आहेत व बऱ्याचशा कौन्फरन्सेसला प्रतिनिधित्व केले आहे. सन १९८३ पासून त्यांचा CANADIAN WHO'S WHO मध्ये समावेश झाला आहे. त्यांचा उल्लेख CANADIAN WHO'S WHO - 2002 Volume XXXVI मध्ये छापून आला आहे तो असा -

Marathe, Eknath V., B.Sc., M.Sc., Ed.D.; physicist, educator; b. Bombay, India 1 June 1923; S. Vyankatesh Vishwanath and Yamuma Vishnu (Agashe) M.; e. Bombay Univ. B.Sc. 1947; Poona Univ. M.Sc. 1955; SUNYB Ed.D. 1978, m. Godawari d. Mahadeo and Janaki Date 5 June 1952; children : Aruna, Sanjay; Head of Science, Grantham High School 1965-88; Demonstrator, Physics, Fergusson Coll., Poona, India 1947-50; Rsch. Physicist Kaycee Industies Ltd., Poona 1950-52; Natnl. Chemical Lab. of India 1952-55; came to Canada 1955; Nuclear Res. Lab., McMaster Univ 1955-56; Lecturer in Physics, Univ. of Guelph 1956-60; post-grad. work in Physics, Univ of Manitoba 1960-61; Science Teacher, St. Catharines Collegiate 1961-65; teacher, Advanced Technical Courses, Niagara Coll. of A.A. & T.; Assoc., Althouse Coll. of Ed., Univ of Western Ont.; Brock Univ., Coll. of Ed., Visiting Prof., Univ. of Western Ont; Brock Univ., Coll of Ed., Visiting Prof. Univ. of Poona, India, Sept.-Nov. 1984; prepared TV Science Education Programs for University Grants Comn., Govt. of India; mem, Del on Sci. & Technology Educ. to People's Republic of China, June 1987 and Australia and New Zealand June 1989, Pres. India-Canada Assn. of Niagara Region 1971-72, 1977-78, 1994-95, mem., Torch International, Pres. St. Catharnes Club 1974-75 (reciptent, Award of Distinction of the Club 1999); Bd. of Dir., Science Teachers Assn. of Ont. 1980-82; mem. at large, Extve Ctte. of the Ont. Section of the Am. Assn. of Physics Teachers, 1983-84; mem. Cdn. Assn. of Physicist am. Physical Soc.; Am. Assn. of Physics Teachers; Life Mem., Nat. Science Teachers Assn.; S.T.A.O.; Cdn. Science Writers' Assn.; Planetary Soc.; has published 3 scientific rsch. papers, 9 scientific articles & contributed 41 papers and workshops to national and internat. conferences India, Canada, U.S.A., Israel (twice), Australia, New Zealand (twice), West Germany, Philippines, U.S.S.R., UNESCO (Paris, France), The Netherlands, Thailand; receipent, Dr. S.G.B. Robinson Travelling Fellowship of OSSTF to travel to People's Republic of China 1987; STAO Service Award for Outstanding Contrib. to Science Education in Ont. 1988; The Cdn. Healthy Environment Award, Environment Canada 1996, currently involved in devel. of Science, Technology & Society Course at an advance level and the text material for the same; Chrmn., Ecological & Environmental Adv. Ctre., Regional Municipality of Niagara 1998-2001; has written monographs on water, bogs, wetlands, watersheds, bio-diversity, indoor air pollution and modern city form and the problem of urban sprawl; also a report on rare, threatened, or endangered trees in Niagara Region: www.regional.niagara.on.ca; languages spoken and written: English, Marathi; recreations; reading, writing, gardening, classical music of India; Home: 25 King's Grant Rd., St. Catharines, Ont. L2N 2S1.

***

## दृष्टिभेट

सूर्याचे कलले बिंब
कानात वाजतो वारा
सोनेरी वाळू उडते
लाटांचा तिला दरारा

तू येशिल म्हणुनी बसलो
किति वेळ? तुला सांगू मी
पण धीर धरे ना तेव्हा
परतण्यास उठलो मी.

तेव्हा मज सांज म्हणाली,
का उगाच होसी खिन्न?
भेटीस नको तू मानू
प्रतिक्षाच प्रीतिचे चिन्ह

ही कथा 'रवीची', त्याने
मजसाठी ताटकळावे
तो जातो जातो वाटे
तोच मी भेटिला यावे

मज पाहुन क्षणभर थांबे
भरधाव रथहि मग त्याचा
चहुबाजू उडे गुलाल
सोहळा दृष्टिभेटीचा

ती दृष्टिभेट अन तो क्षण
आम्हास पुरेसा होतो
त्या आनंदातच आम्ही
आपुले मार्ग अनुसरतो.

- **मोरेश्वर हरि** (पृ.५४२),
शिरसई, गोवा.



Marathe Pratishthan

# वार्धक्याविरुद्ध लढा

*(मागील अंकांतील लेखाचा उर्वरित भाग)*

- **डॉ. सौ. सीमा श्याम** (पृ.४११), पुणे

वार्धक्याकडे पाठ फिरवून उलट्या दिशेला जायचं आहे ना? म्हणजेच तारुण्यावस्थेत जास्त काळ राहायचे आहे ना? मग आपल्याला योग्य ती काळजी व उपाय करायला हवेत. ॲलोपाथी, आयुर्वेद, नेचरोपाथी यांचे मिश्रण वापरायला हरकत नाही. **खाली दिलेले उपाय** जरूर वाचून घ्या व ते आमलात आणण्याचा प्रयत्न करा.

**१) ॲंटीऑक्सिडंट** - आपण वर उल्लेखिलेल्या फ्री विषवत् रॅडिकल्स म्हणजेच ऑक्सिडंटस् यांची शरीरात निर्मिती होते. तर यांच्या विरुद्ध क्रिया करणारे औषध घ्यायला हवे. ह्यालाच 'ॲन्टी ऑक्सीडंटस्' रसायन म्हणतात. उदाहरणार्थ - स्पिरूव्हिन. ह्याच्या गोळ्या मिळतात किंवा पावडर स्वरूपातहि मिळते. हे घेतल्याने विषवत् रॅडिकल्सचा नाश होतो. शरीर तरुण व सतेज दिसू लागते. उत्साह वाढतो. आपण आनंद देणारं जेवण जरूर जेवा पण त्यानंतर एक स्पिरूव्हिनची गोळी घ्यायला विसरू नका. 'ॲन्टी ऑक्सीडंट' हे शास्त्रज्ञाच्या मेहनतीचे फळ आहे.

**२) त्वचेवरील उपाय** - सर्वांत प्रथम वार्धक्याकडे झुकत आहोत हे आपल्याला आपली त्वचा सांगते. त्वचेवर सुरकुत्या पडतात. विशेषत: चेहऱ्यावरील. तिचा रंग बदलतो. इलॅस्टिसिटी कमी होते. त्वचा मऊ पडते. अल्फा हायड्रॉक्सी ॲसीडस् असलेली क्रीमस् व लोशनस् लावावी? त्यामुळे त्वचेचा अगदी वरचा थर जो मेलेल्या पेशींचा असतो तो निघून जातो व त्वचा रसरशीत, ताजीतवानी, सतेज होते. स्वच्छ होते.

व्हिटॅमिन ए (Retin A) हे द्रव्य प्रथम चेहऱ्यावरील मुरूमांकरिता त्वचारोगतज्ञच वापरत. नंतर सौंदर्यप्रसाधने करणाऱ्या कंपन्या ते त्यांच्या क्रीमस्‌मध्ये वापरू लागल्या. व्हिटॅमीन ए (रोटिन ए) मुळे हवेतील प्रदूषण व सूर्यप्रकाश यामुळे त्वचेवर झालेले आघात दूर होतात. रंग उजळतो.

१८८५ साली क्रिस्निअल डागर या शास्त्रज्ञाने 'लायपोसोम' या मालिकेतील द्रव्ये शोधून काढली. हे द्रव्य त्वचेला लावल्यास अनेक वर्षांनी त्वचा तरुण होते. हे त्वचेमध्ये खोलवर जाते. कार्य करते.

प्रायमॉर्डिअल क्रीम (व्हिटॅमिन ई युक्त) त्वचेवर लावल्यास ते त्वचेच्या आतील स्तरांपर्यंत पोचते. या द्रव्याची कॅप्सूलही मिळते.

अल्फा हायड्रॉक्सी ॲसिडस् (A.H.A.S.) सर्व प्रसाधनांमध्ये, म्हणजे क्रीमस्, लोशनस्, शॅम्पूज वगैरे मध्ये वापरतात. म्हणूनच मॉइश्चरायझर व सनस्क्रीन लोशनचा जरूर वापर करावा व प्रखर सूर्यप्रकाशापासून जपावे.

> **जीवन म्हणजे नक्की काय?**
>
> - जीवन एक देणगी आहे, तिचा स्वीकार करा.
> - जीवन हा खेळ आहे, खेळत रहा.
> - जीवन एक गाणे आहे, गात रहा.
> - जीवन प्रेममय आहे, त्याचा आनंद घ्या.
> - जीवन हे सौंदर्य आहे, प्रशंसा करा.
> - जीवन एक संघर्ष आहे, त्याच्याशी लढा.
> - जीवन एक कोडे आहे, ते सोडवा.
>
> संग्राहक - **चिंतामण महादेव** (पृ.२२२), लालबाग, मुंबई

व्हिटॅमीन 'ई' व 'सी' योग्य प्रमाणात घेतल्यास त्वचा सतेज होते.

आयुर्वेदात सांगितल्याप्रमाणे काही द्रव्ये एकत्र करून उटणी तयार करावी व ती नियमाने आंघोळ करण्यापूर्वी पंधरा मिनिटे लावावी. सर्वसाधारणपणे हरभरा डाळीचे पीठ, मसूर डाळीचे पीठ, मंजिष्ठा, दारूहळद, आवळ्याचे चूर्ण, कापूर, चंदनाची पावडर, कापूरकाचरी, वाळा ही द्रव्ये वापरतात. ह्या उटण्यात दूध, दही वा लिंबाचा रस घालून मिश्रण तयार करावे व ते चेहरा, हात, मान, पाय यांना लावावी. पंधरा मिनिटांनी आंघोळ करावी.

**३) आहार** - देश, काल व उपलब्धता लक्षात घेऊन विचारपूर्वक आहाराकरिता घटक निवडावेत. शास्त्राला धरून व स्वत:च्या प्रकृतिनुसार अन्नपदार्थांची योजना करावी. ताजे अन्न योग्य वेळी योग्य प्रमाणात द्यावे. आहारतज्ञ (डायटेशियन) प्रत्येक व्यक्तीची प्रकृती तपासून योग्य तो आहार सांगतातच. पण आपण स्वत:सुद्धा आहार घटकांचा विचार करावा. अन्न शक्यतो शाकाहारीच असावे किंवा फारतर सेमी शाकाहारी असावे.

आपल्याला तारुण्यावस्थेत अधिक काळ राहायचे आहे ना? मग निसर्गाने बहाल केलेले, सुंदर नैसर्गिक व ताज्या भाज्या, फळे व धान्यांचे भक्षण करावेच लागेल. फळे खाल्ल्याने आपण ताजेतवाने होतो. ॲन्टीऑक्सीडंटस् असल्यामुळे तारुण्य टिकण्यास मदत होते. फळभाज्या व पालेभाज्यांमध्ये फायटोकेमिकल्स, उपयुक्त ॲसिडस्, व्हिटॅमिन्स, क्षार अशी द्रव्ये असतात. व्हिटॅमिन ए व इ हे डोळे व त्वचा सुंदर ठेवतात. कच्च्या कोशिंबिरी नेहमी जेवणात असाव्या. सर्व तऱ्हेची कडधान्ये, डाळी, गहू, तांदूळ, मका वगैरे आहारात असतातच. पण ते कोंड्यासकट खावेत. सोयाबिन हे उत्तम प्रथीन आहे. त्याचे पीठ किंवा दूध वापरावे. दूध, दही, तूप योग्य प्रमाणांत घ्यावीत. यांतील प्रथिने व स्निग्ध पदार्थ पचावयास सोपे असतात. शिवाय मल्टी व्हिटॅमिनची एक गोळी रोज जेवणानंतर घ्यावी.

**४) शरीराची स्वच्छता - स्नान** - दिवसातून दोन वेळा सकाळी व संध्याकाळी कोमट पाण्याने स्नान करावे. त्वचा स्वच्छ राहतेच पण रक्ताभिसरणही चांगले होते. आयुर्वेदिक पद्धतीने केलेले उटणे लावून आंघोळ करावी.

**५) व्यायाम** - मध्यम स्वरूपाचा, स्वत:च्या प्रकृतीला झेपेल असाच व्यायाम करावा. मोकळ्या हवेत मध्यम गतीने चालावे. काही सोपी योगासने नियमित करावीत.

**६) स्नेहन व स्वेदन (मसाज व स्टीम बाथ)** - तिळाच्या तेलाने सर्व अंगभर आठवड्यातून एक वेळा मसाज करावा. व नंतर वाफेने शेक घ्यावा. यामुळे स्नायूंची पुष्टी होऊन ते स्वस्थ राहातात.



Marathe Pratishthan

तसेच रक्ताभिसरण सुधारते. स्पर्शज्ञान चांगले राहाते. आयुर्वर्धनाकरिता स्नेहन, मर्दन व स्वेदन निश्चितच फार उपयोगी पडते.

७) स्वत:ला आवडत्या कामात व्यग्र ठेवावे. नवीन काहीतरी शिकावे. शिकण्यास वयाचे बंधन नसते. ज्ञानार्जन केल्याने बुद्धी सुस्थितीत राहाते. स्मरणशक्ती कायम अबाधित राहाते.

८) **ध्यान (मेडिटेशन)** - मन व शरीराला ताजेतवाने ठेवण्याकरिता ध्यान करण्याची नितांत गरज आहे. रोजच्या कौटुंबिक, व्यावसायिक, सामाजिक समस्यांमुळे आपल्या मनावर फार ताण पडतो. मनाच्या आतील खोलवरच्या स्तरापर्यंत जाणे ध्यानामुळे शक्य होते. विचारांकडे अलिप्ततेने बघू लागतो व हळूहळू मन स्थिरावते व एक तऱ्हेची गुंगी शरीरभर पसरते. विचार पूर्णपणे थांबतात.

अशा अवस्थेत साधारण २० मिनिटे राहिल्यास मनाची शुद्धी होते. श्वसन सुधारते. परिणामी शरीरही स्वस्थ राहाते. ध्यान करण्याची वेळ शक्यतो सकाळी लवकर किंवा झोपण्यापूर्वी ठेवावी. प्रथम पाच मिनिटांपासून सुरवात करून नंतर अर्ध्या तासापर्यंत वेळ वाढवावा. एकच ठराविक शांत ठिकाण निवडावे.

या लेखाचा समारोप करताना मी सांगू इच्छितें की आयुर्मयादा नुसती वाढून चालणार नाही. तर ते दीर्घ आयुष्य स्वस्थ व आनंदी असले पाहिजे. तरच त्याचा आस्वाद घेता येईल, नाही का? त्याकरिता काया, वाचा व मन यास शिस्त व लयबद्धता आणावी. ठराविक गतीने ठराविक दिशेलाच जावे लागते. आपल्याला मन व शरीराची बाहेरील जगाशीही सुसंगती साधावी लागते आणि हे कठीण नाही. 'प्रयत्नांती परमेश्वर' ह्या वचनाप्रमाणे प्रयत्नशील राहिल्यास साध्य सहजतेने गाठता येते.

***

# ।। कृतज्ञता अष्टादशक ।।

*(भगवान कृष्णास उद्देशून)*

- **प्रभाकर सीताराम** (पृ.३२७), सांताक्रुझ, मुंबई

***मागील दोन अंकांत (मार्च व जून २००३) प्रभाकर सीताराम यांनी १२५ श्लोकांत गीतेचे सार (गीताज्ञान नवनीत) वाचकापर्यंत पोचवले. त्यांनी भगवान श्रीकृष्णाला उद्देशून रचलेले कृतज्ञता अष्टादशक - संपादक***

चमत्कर्ता तू अद्‌भुत तुझी ख्याति असे अशी ।
पंगूस नेशी शिखरी मुक्या वाचाळ कारशी ।।१।।

चमत्कार तसा झाला मत्संगे करणी तुझी ।
अल्पधीस म्यां नेलेस गीतेच्या शिखरावरी ।।२।।

भयभीत मी असता म्हणसी तू भीऊ नको ।
धर बोट तुला नेतो सुखे देशी गीतांतरी ।।३।।

ज्ञानप्रकाशे केलास अज्ञानतम नष्टहि ।
कृपाप्रकाशे ती तत्त्वें गुह्यें केलीस स्पष्ट ती ।।४।।

शंकराचार्य आदि ते रहस्यकार 'बाळ' ते ।
हे पांडुरंग दादाजी शिवानंदहि सर्व ते ।।५।।

दिलेस प्रेषित हे ची मार्गदर्शी गुरूच ते ।
त्यांचा कृतज्ञ आहे मी भक्तीने नमतो तयां ।।६।।

मिळे तुझी कृपानौका नावाडी तव प्रेषित ।
सुखे प्रवास केला मी गीतेच्या ज्ञानसागरीं ।।७।।

म्हणसी कर तू आता भाषांतरित ज्ञान हे ।
प्रत्यक्ष बोधि हे ज्ञान मद्‌भक्तां ज्ञात होऊ दे ।।८।।

म्हणालासहि गीतेंत, गुह्य हे ज्ञान परम ।
देई भक्तांस माझ्या जो मला अत्यंत तो प्रिय ।।९।।

कसे ते शक्य होईल केला श्लोक कधी न मी ।
म्हणसी मी उभा मागे युक्त शब्दां सुचीविन ।।१०।।

केले आरंभ ते कार्य विश्वासें वचनीं तव ।
तुझ्या कृपेने झाले ते सिद्ध सुगम सत्वर ।।११।।

मला दुस्तर हे कार्य झाले सम्पन्न ते सुखें ।
निमित्त मात्र झालो मी, कार्य श्रेय तुलाच तें ।।१२।।

होणे निमित्त त्वत्कार्या, नसे भाग्यहि थोडके ।
पामरास मिळाले या कृपासिंचन हे तुझे ।।१३।।

निमित्तें याच आला जो तुझा संपर्क निर्मल ।
गेला देऊन आनन्द दिव्य तो इन्द्रियातीत ।।१४।।

कसा दीनास झाला या नसता तैशी पात्रता ।
बुद्धीस्पर्श तुझा दिव्य चमत्कार असेच हा ।।१५।।

न अभ्यास नसे भक्ति ती अनन्य हवी जशी ।
न प्रतिभा न कर्तृत्व असे अल्पमतीस या ।।१६।।

तरी ते जमले श्लोक शब्दानीं युक्त ते तुझ्या ।
त्यानीच आणिला अर्थ कथिला गुरुनीच त्या ।।१७।।

चमत्कार असा झाला दिव्य आनंद लाभला ।
तुझ्या कृपाप्रसादाने झालो मी धन्य अंतरी ।।१८।।

*।। समाप्त ।।*

**खुषीपत्र १**

## 'भाल'चंद्र प्रशस्ती

१. हितगुज अंक ५४, जून २००३ मिळाला. गीताज्ञान नवनीत दोषमुक्त तर आहेच; वरती गुणयुक्त आहे. खूप आवडले.
२. अण्णा पुतळीबाईच्या कचाट्यातून वाचले (मनोज मराठे) आणि गजाआडचे गुणवान (अच्युत चक्रदेव) हे अनुभव वाचनीय.
मराठे हितगुजचे, नित्यवाचन जो करी।
आनंद त्याजला लाभे, सोयीची माहिती बरी।।

- **भा. ल. महाबळ**, मुलुंड, मुंबइ

***मराठे प्रतिष्ठानच्या सभास्थानी काल। भालचंद्र प्रशस्ती प्राप्त जाली।। - संपादक***

**खुषीपत्र २**

## डेराभर ताकातले डावभर नवनीत

हितगुज जून अंक मिळाला. **गीताज्ञान नवनीत** - संपूर्ण गीता वाचणे व त्याचा अर्थ पचनी पाडणे कठीणच. मात्र श्री. प्रभाकर सीताराम यांनी श्रीकृष्णाच्या डेराभर ताकातून वाचकांसाठी काढून दिलेले हे डावभर नवनीत मन संतुष्ट, प्रसन्न करणारे असल्यामुळे **वाचकांना ते लाख मोलाचे भावेल.**

- **भास्कर नरहरी** (पृ.४६) रत्नागिरी



Marathe Pratishthan

# मराठे प्रतिष्ठानचे सातवे अखिल भारतीय अधिवेशन

**स्थळ** - ज्ञानेश मंगल कार्यालय, ज्ञानेश्वर पादुका चौक, ११७९/३, शिवाजीनगर, पुणे

**काळ** - २२ डिसेंबर २००३ ला संध्याकाळी ४ पासून २४ डिसेंबर २००३ ला संध्याकाळी ८ पर्यंत

## अखिल भारतीय अधिवेशनासाठी पुणे शाखेतर्फे खास आमंत्रण

१९७९ मधे ४-५ मराठे एकत्र आले. त्यांच्या गप्पांमधून मराठे प्रतिष्ठानची स्थापना करण्याचा निश्चय झाला आणि बघता बघता प्रतिष्ठानचे रोपटे लावले देखील गेले. ही वार्ता अनेक कुलबांधवांपर्यंत पसरली. त्यांनी या रोपट्याची कष्टरूपी मशागत करून, पैसारूपी पाणी घातले. त्यामुळे प्रतिष्ठानचे झाड लहरायला लागले. आता तर ऐन तारुण्यातला पंचविशीचा हा वृक्ष डौलाने उभा राहून अनेकांना सावली देत आहे.

त्यामुळे यंदाचे हे मराठे प्रतिष्ठानचे सातवे अखिल भारतीय अधिवेशन पुणे शाखेने आयोजित करण्याचे निश्चित केले आहे. हे अधिवेशन २२, २३ व २४ डिसेंबरला होणार आहे. पुणे शाखेला हे अधिवेशन तिसऱ्यांदा भरवण्याचा मान मिळत आहे.

या अधिवाशनाची वर्गणी ३ वर्षांवरील सर्वांसाठी माणशी २०० रु. एवढी निश्चित केली आहे. या २०० रु. मधे २२ तारखेला सायंकाळी चहा व रात्रीचे जेवण, २३ तारखेला ३ वेळा चहा, नाष्टा (सकाळी), दुपारचे व रात्रीचे जेवण आणि २४ तारखेला ३ वेळा चहा, नाष्टा व दुपारच्या जेवणाचा समावेश आहे.

बाहेरगावहून येणाऱ्या बंधूभगिनींसाठी तेथेच निवासाची सोयही उपलब्ध केलेली आहे.

या अधिवेशनात मुलाखत, व्याख्याने, सत्कार, परिसंवाद, Quiz Competition, विविध गुणदर्शन व गाण्यांच्या कार्यक्रमांचा आस्वाद आपण घेऊ शकाल.

या अधिवेशनात आपणास एखादा **कार्यक्रम सादर करण्याची** इच्छा असेल तर जरूर कळवावे. ज्या व्यक्तींना स्वत: तयार **केलेल्या वस्तूंचे किंवा** स्वत: लिहिलेल्या **पुस्तकांचे प्रदर्शन व विक्री** करण्याची इच्छा असेल त्यांनी आधी कळवल्यास **स्टॉल मोफत** उपलब्ध होऊ शकेल.

ज्या व्यक्ती स्वतंत्र व्यवसाय करतात त्यांना आपल्या **व्यवसायाची माहिती** इतरांपर्यंत पोचवण्याची इच्छा असेल तर व्यवसायाच्या प्रसिद्धी व वृद्धीसाठी आपल्या कुलबांधवांना **माहिती पत्रके वाटायची इच्छा** असेल तर ते अवश्य वाटू शकतील.

तरी **जास्तीत जास्त संख्येने अधिवेशनाला उपस्थित राहून सर्व कार्यक्रमांची शोभा वाढवावी.** जूनच्या हितगुजमधून आपणास पूर्वसूचना दिलेली आहेच. त्यामुळे सर्व कामे व अडचणी बाजूला सारून आपल्या घरचेच कार्य आहे असे समजून सहकुटुंब, सहपरिवार अवश्य उपस्थित रहावे.

सोबत सविस्तर कार्यक्रम पत्रिका देत आहोत. आपणास अधिक माहिती किंवा काही सूचना करायच्या असतील तर पुढील पत्त्यावर प्रत्यक्ष किंवा पत्राद्वारे किंवा फोनवर संपर्क साधावा.

१) **सौ. नीलांबरी रमेश मराठे**
व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र, ६४२, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक, प्राथमिक नू. म. वि. शाळेसमोर, पुणे - ४११ ०३०.
फोन : ४४५६२७०
संपर्क : सकाळी १०.३० ते १.३०
संध्याकाळी ५.३० ते ८.३०

२) **श्री. अरुण दत्तात्रय मराठे**
१७५९ सदाशिव पेठ, भिकारदास मारुती जवळ, मराठे वाडा, पुणे - ४११ ०३०.
फोन : ४४७३२८१
संपर्क : २४ तास उपलब्ध.

आपण (१) किती माणसे व केव्हा येणार (२) कोणत्या कार्यक्रमात सहभागी होणार, (३) आपणास स्टॉल हवा काय **ही माहिती आणि प्रश्नावली यांसोबत कृपया ३१ ऑक्टोबर २००३ पर्यंत लेखी कळवावे ही विनंती.**

### व्यक्तिगत माहितीसाठी प्रश्नावली

१) कुटुंब प्रमुखाचे पूर्ण नाव :

२) जवळच्या खुणेसकट पूर्ण पत्ता :

३) फोन नंबर : ४) मोबाईल नंबर :

५) असल्यास ई-मेल नंबर :

६) सध्या कुटुंबात रहात असलेल्या एकूण सदस्यांची संख्या :
प्रत्येक व्यक्तीचे नाव - जन्मतारीख - लिंग - शिक्षण - चालू/पूर्ण नोकरी किंवा व्यवसाय - विवाहित/अविवाहित -मासिक प्राप्ती - रक्तगट - विशेष गुण किंवा छंद - नोकरी व्यवसाया व्यतिरिक्त करत असलेले कार्य - इतर इत्यादि माहिती **स्वतंत्र कागदावर** द्यावी.

७) आपल्या कुटुंबातील ज्या व्यक्ती (उदा. मुले किंवा इतर) स्वतंत्रपणे दुसरीकडे रहात आहेत त्यांची नावे - पत्ते - फोन नंबर इत्यादि माहिती **स्वतंत्र कागदावर** द्यावी.

८) मराठ्यांच्या विवाहित माहेरवाशिणी म्हणजेच आपल्या बहिणी किंवा मुली सध्या कोठे रहात आहेत त्यांची नावे - पत्ते - फोन नंबर - वय - शिक्षण - सध्या काय करत आहेत - इतर इत्यादि माहिती **स्वतंत्र कागदावर** द्यावी.



Marathe Pratishthan

९) सध्या हयात असलेल्या आपल्या सख्ख्या भावांची नावे - पत्ते - फोन नंबर इत्यादि माहिती **स्वतंत्र कागदावर** द्यावी.

१०) मृत असलेल्या भावाच्या मुलांची नावे - पत्ते - फोन नंबर इत्यादि माहिती **स्वतंत्र कागदावर** द्यावी.

११) आपल्या नात्यातील (मराठे परिवारापैकी) परदेशात रहात असलेल्या व्यक्तींची नावे - पत्ते - फोन नंबर इत्यादि माहिती **स्वतंत्र कागदावर** द्यावी.

१२) आपल्या कुलबांधवांपैकी तुमच्या माहितीतल्या किंवा नात्यातल्या अशा कोणी व्यक्ती आहेत का, की त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे. त्यांचा सत्कार अखिल भारतीय/जागतिक मेळाव्यात केला पाहिजे असे तुम्हाला वाटते. असे ज्यांच्याबद्दल तुम्हाला वाटत असेल त्यांची नावे, त्यांच्या कार्याचा तपशील **स्वतंत्र कागदावर लिहून** जरूर कळवावे. जर कोणत्याही वर्तमानपत्रात त्यांच्या उल्लेखनीय कार्याची बातमी, फोटो प्रसिद्ध झाला असेल तर शक्य असल्यास वर्तमानपत्रातील कात्रण पाठवावे.

(सत्कार कोणाचा करायचा यासंबंधी अंतिम निर्णय मराठे प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ घेईल. कृपया गैरसमज नसावा.)

## अधिवेशनाची कार्यक्रम पत्रिका

**सोमवार दि. २२-१२-२००३**

| | |
|---|---|
| सायं. ४ ते ६ | नोंदणी, स्वागत व परस्पर परिचय |
| ६ ते ७ | **श्री. सतीश मराठे,** अध्यक्ष युनायटेड वेस्टर्न बँक सातारा यांची मुलाखत |
| ७ ते ८ | Quiz Competition |
| रा. ८ ते ९।। | डॉ. सुधाकर मराठे यांचे गायन |
| ९।। | रात्रीचे जेवण |

**मंगळवार दि. २३-१२-२००३**

| | |
|---|---|
| स. ८ ते ९ | नाष्टा व चहा |
| ९ ते १२ | प्रतिष्ठानचा मुख्य कार्यक्रम. यामधे २५ वर्षाच्या कार्याचा आढावा, हितगुज वृद्धी व प्रसार, कुलवृत्तांत व आर्थिक तरतुदी, अध्यक्षांचे व्याख्यान, सत्कार, मनोगते असे विविध कार्यक्रम. |
| दु. १२ ते ३ | भोजन व विश्रांती |
| ३ ते ४ | योगमार्गदर्शन **श्री. प्रभाकर मराठे** |
| सायं. ४ ते ८ | विविध गुणदर्शन |
| रा. ८ | रात्रीचे जेवण |

**बुधवार दि. २४-१२-२००३**

| | |
|---|---|
| स.८ ते ९ | नाष्टा व चहा |
| ९ ते १०।। | तणाव मुक्त जीवनावरील कार्यशाळा श्री. अनुरुप मराठे |
| १०।। ते १२ | विविध गुणदर्शन |
| दु. १२ ते ३ | भोजन व विश्रांती |
| २ ते ३ | तरुणांसाठी विकास मार्गदर्शन Formula for Success |
| ३ ते ४ | परिसंवाद (१) प्रतिष्ठानकडून तरुणांच्या अपेक्षा (२) माझी जीवनातील वाटचाल (वेगवेगळ्या दोन दालनात एकाच वेळी) |
| सं.४।। ते ५।। | समारोप व कुलबांधवांचे मनोगत |
| ५।। ते ८ | सौ. अनुराधा मराठे यांच्या गायनाने कार्यक्रमाची सांगता |

आयत्या वेळच्या परिस्थितीनुसार कार्यक्रमाचा दिवस व वेळ यामधे सोयीनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

आपण निश्चित येत असल्याचे व कोणत्या कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी होणार ते कृपया ३१ ऑक्टोबर पर्यंत लेखी कळवावे ही विनंती.

## हाडांच्या व केसांच्या आरोग्यासाठी विनामूल्य चाचण्या

आपले एक कुलबांधव हेमंत महादेव मराठे, मुंबई यांच्या सहकार्याने **अधिवेशनस्थळी** खालील दोन महागड्या वैद्यकीय चाचण्या उपस्थितांना **विनाशुल्क** अथवा अत्यल्प खर्चात उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न चालू आहेत.

१) निकोलस पिरॅमल या कंपनीच्या सहकार्याने **बोन मिनरल डेन्सिटी मापन**

२) प्रॉक्टर ॲण्ड गॅंबल - पॅंटीन या कंपनीच्या सहकार्याने **हेअर केअर ॲडव्हाईस**

या दोन्ही चाचण्यासाठी माणशी सुमारे १० मिनिटाहून जास्त वेळ लागणार नाही. तसेच या दोन्ही चाचण्या **पूर्णपणे वेदनारहित** आहेत. सुईसुद्धा टोचावी लागत नाही. **या सुवर्णसंधीचा कुलबांधवांनी मोठ्या प्रमाणात फायदा घ्यावा असे आवाहन आहे.**

**खुशीपत्र**

## Bravo पूनावालों !

हितगुज जून २००३ चा अंक २८.६.२००३ ला मिळाला. अंकाचे उत्सुकतेने प्रतीक्षेतच होतो.

प्रतिष्ठानचे अधिवेशन पुण्यात घेण्याचे निश्चित झाल्याचे वृत्त वाचून अतिशय आनंद झाला. आपले संमेलन द्विवार्षिक स्वरूपाचे. म्हणजे १९९७ नंतर १९९९ व २००१ अशी दोन गळाली. प्रतीक्षा करावी लागली कि लज्जत वाढते, तसेच काहीसे या संमेलनाबाबत झाले आहे. शवटी पुणेकरांनी हिंमत दाखविली. पुणेकर कार्यकर्ती मंडळी नेहमीच अग्रेसर असतात. प्रतिवर्षी २६ जानेवारीला त्यांचे संमेलन अत्यंत नेटकेपणी संपन्न होत असतेच. 'पुणे तेथे काय उणे' असे नेहमीच म्हटले जाते ते किती अन्वर्थक आहे नाही का? Bravo पूनावालों !

**- भास्कर नरहरी** (पृ.४६)
रत्नागिरी



Marathe Pratishthan

# आण्णांनी मुलामुलींचे एकत्रित नाटक केले

**- मनोज यशवंत** (पृ.४४४), पुणे.

*पुण्यातले प्रतिष्ठानचे कार्यकर्ते कै. यशवंत गजानन यांच्या आयुष्यातील एका रोमांचकारी प्रसंगाची हकिगत मागील जून अंकात वाचलीत. त्याच आण्णांनी ५० वर्षांपूर्वी कॉलेजात मुलामुलींचे एकत्रित नाटक करण्याची प्रथा सुरू केली, त्याबाबात त्यांच्या मुलाचा हा लेख. आण्णांच्या अल्प परिचयासाठी पहा हितगुज जून २००२ - संपादक*

शिवपुरीला आम्ही ७-८ वर्षे होतो. तेथील कॉलेज MSc पर्यंत आहे. आण्णा Physics चे वर्ग घेत असत. ते आवडते शिक्षक होते. त्यांच्याजवळ घरी शिकायला येणाऱ्या मुलांची संख्याही मोठी होती.

शिवपुरीला कॉलेजच्या विविध कार्यक्रमांत त्यांचा पुढाकार असे. NCC चे Incharge होते. २६ जानेवारीला त्यांनी आपल्या NCC च्या छात्रांसह तेथील कलेक्टरला दिलेली मानवंदना अजूनही कित्येकांच्या स्मरणात आहे. त्यांनी NCC चे camps उत्तम रीतीने पार पाडले. Games, Dicipline अशा विविध कमेट्यांमधे त्यांचा समावेश होता.

कॉलेजच्या स्नेहसंमेलनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची जबाबदारीही त्यांचेकडेच होती. ५० वर्षांपूर्वीचा तो काळ होता. त्यावेळी मुली विशेषत: संध्याकाळी घराबाहेर पडत नसत. मुलींना असणारी असुरक्षितता, मुलांकडून होणारा त्रास ह्या सर्व गोष्टी प्रामुख्याने घडत होत्या. मुलींना स्टेजवर नाटकात मुलांबरोबर काम करू देण्यास कोणीच पालक तयार होत नसत.

त्या वर्षी गॅदरींग मधे १।। तासाचे हिन्दी नाटक बसवण्याचे काम आण्णांकडे आले. ऑर्केस्ट्रा (वाद्यवृन्द) ही सोबत बसवायचा अशी दुहेरी कामगिरी होती. नाटकात ४ मुलींची आवश्यकता होती. कुणीही मुली नाटकात काम करायला तयार होईनात. बऱ्याच ठिकाणाहून नकार आल्यावर आण्णांनी स्वत: मुलींच्या पालकांची भेट घेतली. त्यांना स्वत:च्या जबाबदारीवर मी तुमच्या मुलींना नाटकात घेतो असा विश्वास दिला. इतके सांगितल्यावर पालकांकडून होकार आला. ''मराठे साहब हम आपके भरोसे लडकियोंको भेज रहे है हमें और किसी पर विश्वास नही है'' ह्यानंतर मुली आमचे घरी तालमीला येऊ लागल्या. आमच्या घरी तालमी चालायच्या त्या वेळी मी लहान होतो पण थोडे आठवते.

अखेर सांस्कृतिक कार्यक्रमाचा दिवस उजाडला. आम्ही सर्व बघायला गेलो होतोच. आण्णांनी सर्व प्रकारची चोख व्यवस्था ठेवली होती. (थोडक्यात म्हणजे चोख बंदोबस्त केला होता). कारण दंगा होण्याची खूपच शक्यता होती. पण सर्व कार्यक्रम सुरळीत पार पडले. नाटक व वाद्यवृन्दाची सर्वांनी मुक्तपणे प्रशंसा केली. आण्णांच्या चेहेऱ्यावर समाधान होते. पालकांनी व प्रेक्षकांनी आण्णांना कार्यक्रम चांगला झाल्याची पावती दिली. स्टेजवर मुलामुलींचे एकत्र नाटक करण्याची प्रथा पाडण्याचा मान आण्णांनी पटकावला. त्यानंतर मुली स्टेजवर कामे करू लागल्या.

ग्वाल्हेरला आण्णांनी केलेला Shadow play सुद्धा गाजला होता. स्टेजची सोय नसताना, सर्वांनी मिळून तखत एकत्र करून स्टेज निर्माण केले. पडदे लावणे, दोऱ्या बांधणे, रंगमंचावरील सजावट हे सर्व आण्णा आपल्या मित्रांच्या मदतीने करत असत. त्यावेळी ते ग्वाल्हेरला सायन्स कॉलेजमधे शिकत होते. पांढरा शुभ्र पडदा बांधून त्यामागे नौका चालवण्याचा आभास निर्माण करणे, त्याला पोषक असे पार्श्वसंगीत, लाटांचा व समुद्रावरील वातावरणाचा आभास निर्माण केला जात असे अशा या तुटपुंज्या साधनांनी उभारलेला Shadow play पार्श्वसंगीत व आण्णांच्या निवेदनामुळे लोकांना भारून टाकत असे. त्यालाही तुफान गर्दी होत असे. ***

**खुषीपत्र**

हितगुज जूनचा अंक मिळाला. अण्णा पुतळीबाईच्या कचाट्यातून वाचले - श्री. मनोज यशवंत यांनी शब्दांकित केलेला हा प्रसंग अंगावर रोमांच उभे करणारा तसेच ''देव तारी त्याला कोण मारी'' या उक्तीची प्रचीती देणारा आहे.

**- भास्कर नरहरी** (पृ.४६), रत्नागिरी.

# सशांची देखभाल - मानसिक संतुलनासाठी !

**- अच्युत महादेव चक्रदेव** (पृ.७३२), निवृत्त कारागृह अधीक्षक, पुणे

*तुरुंगाधिकाऱ्याचे काम म्हणजे हडेलहप्पीपणाने तुरुंगातील कैद्यांचे नियंत्रण व देखभाल करणे अशीच सर्वसाधारण आपणा सर्वांची समजूत. पण त्यांनाहि काही नाजूक आजार बरे करण्यासाठी कधी कधी मानसोपचारतज्ञाची भूमिका करावी लागते. निवृत्त कारागृह अधीक्षक अच्युत महादेव चक्रदेव यांचा एक बोलका अनुभव. - संपादक*

पृथक विभागांत काम करताना अनेक अनुभव आले. त्या विभागात सकाळची फेरी मारताना एक अण्णा नावाचा बंदी कायम काहीतरी तक्रार करीत असे. कधी चपाती कच्ची आहे, तर कधी ती जळलेली, करपलेली आहे. कधी शेजारचे बंदी सहकार्य करीत नाहीत, डॉ. साहेब बरोबर औषधपाणी करीत नाहीत. तक्रार करणे हाच त्याचा स्थायीभाव झाला होता. तो तसा खूप अशक्त होता त्याला भेटायलाहि कधी कोणी आले नाही. आपल्याला आता उभे रहाता यायचे नाही हे त्याच्या मनाने पक्के घेतले होते.

याचे मन कुठेतरी गुंतवले पाहिजे, याचेवर काही हलकी जबाबदारी टाकली पाहिजे असे मी ठरवले. कारागृहाचे बाहेर खुले कारागृह आहे. तेथे त्यावेळी बरेचसे ससे आणि पिल्ले होती. त्यातली काही पिल्ले व ससे मा. अधीक्षकांचे अनुमतीने मी पृथक विभागांत आणली व बंदी अण्णाचे शेजारचे कोठडीत ठेवली. अण्णाला



Marathe Pratishthan

सशांसाठी रोज वॉर्डरकडून गवताची सोय करण्यास सांगितले. त्यांची रोज मोजदाद करण्यास सांगितले. माझे फेरीचे वेळी अण्णा काही बोलायच्या आत मीच सशांबद्दल विचारणे सुरू केले. हळुहळु अण्णाच्या स्वत:च्या तक्रारी कमी झाल्या आणि त्याची सशांबद्दलची काळजी वाढू लागली.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे हळुहळु त्याची तब्येत सुधारू लागली. दारावरच्या एका मांजराच्या पिल्लाला, ते दाराचे फटीत सापडू नये म्हणून तिरीमिरीने तो चक्क उभा राहिला आणि ते पिल्लू त्याने खाली उतरवले. नंतर थोडा आत्मविश्वास निर्माण झाल्यावर तो चार पावले टाकू लागला. प्रौढ साक्षर योजनेत त्याने भाग घेतला. लिहू-वाचू लागला.

केवळ मानसिक संतुलन राखण्यासाठी माझे किंचित प्रयत्नाला आलेले हे यश होते. तुरुंगाधिकाऱ्यांना त्यांचे कामात कधी कधी अशी नाजूक, मानसोपचाराची आव्हानेहि पेलावी लागतात.

***

### खुशीपत्र

हितगुज जूनचा अंक मिळाला. गजाआडचे गुणवान हा श्री. अच्युत महादेव चक्रदेव यांचा अनुभव मनाला चटका लावून जातो. परिस्थितीने मनुष्य किती अगतिक बनतो याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. **श्री. चक्रदेव यांनी असे रोचक/उद्‌बोधक अनुभव वाचकांसाठी लिहावे** ही विनंती.

वसंत रावजी यांची **दत्तक पालक** ही **कथा विचारप्रवर्तक** आहे. तळागाळांतील समाजाच्या मुलांच्या सुप्तगुणांना प्रकाशात आणून त्यांचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येकाने आपला खारीचा वाटा उचलण्याची अंत:प्रेरणा समाजात निर्माण करावी ही लेखकाची लेखनामागील गुप्त भावना प्रशंसनीय एवं अंनुकरणीय निश्चितच आहे.

- **भास्कर नरहरी** (पृ.४६),
रत्नागिरी.

# आम्ही मराठी दुकानदार

- **विनायक केशव** (पृ.२०), वरळी, मुंबई

***टॉवेल्स पिशवीत टाकीत मी दुकानाच्या पायऱ्या उतरू लागलो. पाठी वळून मराठी दुकान डोळे भरून पाहून घेतलं. माझी खात्री होती, पुढच्या खेपेला या ठिकाणी सिंधी दुकान नक्की येणार.***

गेल्या वर्षीची गोष्ट. गणपतीचे दिवस होते. नुकताच पाऊस बरसून गेला होता. हवं हवंस वाटणारं पिवळंधमक ऊन छान पसरलं होतं. दरवर्षाप्रमाणे मी गिरगांवातला गणेशोत्सव एन्जॉय (बरा वाटतो ना शब्द?) करीत होतो. दिवस चढत होता, 'हवं हवंस' वाटणारं ऊन त्याच्या तापट स्वभावामुळे 'नको नकोसं' वाटू लागलं. पूर्वस्मृतीमुळे खास गिरगावी पदार्थांची आठवण होऊन जिभेला पाणी सुटलं होतं. पण गिरगावांतलीसुद्धा मराठी माणसांची हॉटेल्स नामशेष झाली होती.

नाईलाजाने पाणी घशांत जिरवून टाकताना एक खास मराठी ढंगाचं, मराठी माणसाचं कापडाचं दुकान नजरेस पडलं. दुकान खूप म्हणजे खूप जुनं होतं. मी गिरगावकर असताना या दुकानातून खरेदी करीत होतो. दुकानाच्या पाटीपासून आतल्या फर्निचरपर्यंत - टी.व्ही. बिघडावा आणि पडद्यावरं दृश्य तसच रहावं तसं ते दुकान स्थितप्रज्ञ होतं. माणसं मात्र निराळी. अर्थात मराठीच होती.

खरं म्हणजे मला काहीच घ्यायचं नव्हतं. पण लवकर घरी गेल्यावर 'ऐ काय, एवढ्या लवकर आलात?' गिरगांवातली (घरच्या माणसांच्या भाषेत माहेरची) माणसं पळाली की काय? उरलय काय आता गिरगांवात? ही मुक्ताफळं टाळण्यासाठी टाईम पास म्हणून दुकानाच्या पायऱ्या चढलो. हात पुसण्याचे छोटे टॉवेल घ्यायचे ठरवलं.

दुकानाच्या दर्शनी उजव्या भागात कॅश काऊंटर (गल्ला) होता. गल्ल्यावर पसरलेले गृहस्थ आतल्या विक्रेत्यांच्या मानाने गुबगुबीत आणि भारी कपडे घातलेले होते. अर्थातच ते मालक असणार असा मी अंदाज केला. मालक रस्त्यावरून जाणाऱ्या माणसांकडे, खास करून खास माणसांकडे निरखून पहात होते. या रसिक माणसाचं लक्ष विचलित करणं माझ्या जिवावर आलं. पण शक्य तो मुलायम आवाजात मी विचारलं ''मालक, हात पुसण्याचे लहान टॉवेल्स आहेत का?'' कपाळाला आठी घालून त्यांनी दुकानाच्या आतल्या भागाकडे बोट दाखवलं.

मी गल्ल्याला लागून असलेल्या एक नंबरच्या विक्रेत्याकडे वळलो. 'टॉवेल' शब्द ऐकताच टिचकीने ढेकूण उडवावा तसा त्यांनी मला नंबर दोनकडे 'पासऑन' केला. नंबर दोनने मी तोंड उघडण्याअगोदरच नंबर तीनकडे मला सुपुर्द केलं. तिसऱ्या नंबरने माझी मागणी ऐकल्यासारखी करीत मला नंबर चारच्या पारड्यात टाकलं.

मी हळूच पाठीमागे वळून पाहिले. तिघेही विक्रेते दात विचकत हसत होते. तिघेही धोतर टोपीवाले होते. चौथा मात्र पुढच्या पिढीतला होता. कमरेला धोतराऐवजी पॅन्ट होती. अंगात फुल शर्ट आणि बुश कोट यांच्या सीमेवर रेंगाळणारा कपडा होता. हिरोटाईप हेअर स्टाईल होती. बहुधा मालकानी सक्ती केल्यामुळे कपाळाला रंगीत 'डॉट' होता. स्वारी स्टुलावर पाठीमागच्या कपाटाला रेलून डुलक्या देत होती. काडेपेटीच्या काडीने नाजूक कोरीव काम करावं तसं कान कोरणं चालू होतं. बहुधा कुठेच नोकरी न मिळाल्याने निराश झालेल्या वडलांनी नाईलाजाने चिरंजीवाना चिटकवलेलं असावं.

आवाजात गोडवा आणि चेहऱ्यावर विनम्र भाव आणून मी पुटपुटलो 'अहो, मला....' वाक्य पुरं करण्याअगोदरच हातातली काडी बाजूला टाकीत त्यांनी मान दुसरीकडे वळवली. तरी मी नेटाने म्हटलं, 'अहो, मालक, मला लहान टॉवेल्स पाहिजे होते.'

'मालक' विशेषणाची गोळी बरोबर लागू पडली.

''काय म्हणालात? टॉवेलस्? टॉवेल्स्

Marathe Pratishthan

## सीतेचे हरण केले, ते कोणत्या झाडाला बांधले?

**- अनंत धोंडो खांबेटे,** (पृ.६९८), शीव, मुंबई

‘‘रावणाने सीतेचे हरण केले’’ ही सत्यकथा जरी पौराणिक, तरी प्राथमिक शाळकरी मुलांच्या मनांवर आजपावेतो वरील वाक्याच्या स्वरूपातच कायमची ठसलेली!! ह्यामुळे गमतीदार प्रसंग अनुभवास येतात!

कै. कृष्णाजी शंकर दिक्षित हे ब्रिटिश अमदानींतले डे. एज्युकेशनल इन्स्पेक्टर. ते १९३५ च्या सुमारास निवृत्त झाले असावेत. त्यांच्या तोंडून आम्ही ऐकलेली हकीगत.

ते म्हणायचे, ‘‘बिगरी, पहिली व दुसरीच्या वर्गावर पाहणीच्या निमित्ताने गेलो असता मी मुलांना विचारीत असे.’’ मुलांनो, तुम्हाला रामायणांतल्या गोष्टी ठाऊक आहेत ना. मग मला सांगा, ‘‘रावणाने सीतेचे हरण केले. ते हरण कोणत्या झाडाला बांधले होते?’’

प्रश्न ऐकून विद्यार्थी बुचकळ्यांत पडायचे. वर्गशिक्षकांकडे आणि परस्परांकडे पाहत राहायचे. ‘कोठल्या झाडाला बरं बांधलं असेल? केळीच्या झाडाला की रामफळाच्या झाडाला?,’ मी सुचवायचो. सर्व मुले निरुत्तर व शिक्षक भेदरलेल्या अवस्थेत!! कै. बाबा दिक्षित पुढं म्हणायचे, ‘‘याचे कारण, रावणाने सीतेचे हरण केले, या वाक्यांतील ‘हरण’ शब्द नेहमीच्या बोली भाषेतला नाही. प्रवचनांतून कथा-कीर्तनांतून, शालेय पुस्तकांतून, मुलांच्या गोष्टींच्या पुस्तकांतून, नाटक, चित्रपटांतून ‘हरण’ हाच शब्द सर्वांच्या कानी पडतो. उपरोक्त माध्यमाद्वारे कधीही रावणाने सीतेला पळविली असा सर्वांना समजणारा शब्द प्रयोग होत नाही.’’

तात्पर्य, सीतेचे हरण होवो, नाहीतर हरीण आपल्याला काय त्याचे......

अनेक सायझीचे असतात.’’

‘‘मला लहान सायझीचा टॉवेल हवा’’ रागाने मी वेडावत उत्तर दिलं.

‘‘सायझी ठरवून का येत नाही?’’

‘‘हात पुसायचा हो’’

‘‘हात काय कोणत्याही टॉवेलला पुसता येतो.’’

‘कमाल आहे’ मनातल्या मनात पुटपुटत हाताचा पंजा ताणीत मी म्हटलं ‘‘हे पहा, ही वीत आहे ना? एवढा पाहिजे.’’

‘‘पण कसला टॉवेल पाहिजे? उंची की फालतू? टर्कीश की साधा? रंगीत की पांढरा? काय पाहिजे ते नेमकं सांगा. उगीच मला खोके उघडायला लावू नका.’’

माझ्यामधला मराठी माणूस जागा झाला. मनात निर्धार केला. घेईन टॉवेल तर इथूनच घेईन. त्यांचीच कात्री घेऊन टराटर फाडून टाकीन. देईन तुकडे दुकानभर फेकून. चाट झाली पाहिजेत ही माणसं. काय, समजतात काय स्वत:ला? पण लगेच माझ्यातला मध्यम वर्गीय माणूस जागा झाला. माणसं चाट होतील पण तीच कात्री आपल्या खिशालापण लागेल. जाऊ द्या.

मला हव्या असलेल्या टॉवेल्सचा तपशील मी शांतपणे दिला.

‘‘हं. हे अगोदरच का नाही सांगितलत? असले टिचभर टॉवेल्स आम्ही ठेवीत नाही. दुसरीकडे बघा.’’

त्याच्या सविकल्प समाधीचा भंग करण्याचं पाप मी केलं होतं.

‘‘आत्ता नसाल ठेवत. पण कितीतरी वर्ष मी इथूनच टॉवेल्स् नेत होते. समजलात?’’ मी मालकाला ऐकायला जावं म्हणून मुद्दामच आवाज चढवीत म्हटलं.

आमचा सुसुंवाद मेहरबान मालकाच्या कानावर गेला असावा.

एका हाताने डोक्यावरची टोपी सावरीत दुसऱ्या हाताने धोतराचा कासोटा सारखा करीत मालक आमच्याकडे झेपावले.

‘‘काय म्हणता साहेब? काय हवय तुम्हाला?’’

मी टॉवेलची मागणी पुन्हा केली.

‘‘मग?’’

‘‘मग काय? हे म्हणतात असले टिचभर टॉवेल्स तुम्ही ठेवीत नाही म्हणून.’’

‘‘काय रे रघ्या, माजलास काय नोकरीवर ठेवला म्हणून? मागच्या मंगळवारी सोलापूरहून माल आलाय ते लक्षात आहे ना? तो बघ. तुझ्या पाठच्या कपाटावरचा हिरवा खोका काढ.’’

मालकाचा रुद्रावतार बघून राघोबा आळेपिळे देत उभे राहिले.

‘‘असे सद्या, स्टुलावर चढ आणि हिरवा खोका काढ.’’

‘‘सदू कशाला? चाकराला पडचाकर? स्टुलावर उभा रहा आणि खोका काढ. एकतर सकाळपासून फक्त चार गिऱ्हाईकं आली. दोघांना तुम्ही चोरानी वाटेला लावलत. तिसरा माल उधार म्हणून घेऊन गेला. काय करणार? वडलांना वचन दिलं नसतं तर हाकलून काढलं असतं एकेकाला.’’

‘‘जाऊ द्या हो मालक. दुपारच्या वेळेला लागली असेल डुलकी.’’

‘‘अहो, डुलकी कसली? आलेल्या लक्ष्मीला पाठ दाखवणारी ही कर्मदरिद्री माणसं आहेत. दुकानच फुंकून टाकतो एकदाचा. येतील चांगले पैसे. मोक्याची जागा आहे. शेजारचा सिंधी दुकानदार केव्हाचा पाठी लागला आहे.’’

टॉवेल्स पिशवीत टाकीत मी दुकानाच्या पायऱ्या उतरू लागलो. पाठी वळून मराठी दुकान डोळे भरून पाहून घेतल. माझी खात्री होती, पुढच्या खेपेला या ठिकाणी सिंधी दुकान नक्की येणार.

मराठी माणूस उद्योगधंद्यात मागे का या प्रश्नाचे उत्तर मला पिशवीतले टिचभर टॉवेल्स देत होते. ***

मराठे प्रतिष्ठानला शुभेच्छा

**मे. वामन शंकर मराठे प्रा. लि.**
**सोने चांदीचे व्यापारी**

ठाण्यातील एक विश्वसनीय पेढी

अभिवादन, (१ला मजला), शिवाजीपथ,
ठाणे ४०० ०६२.

Marathe Pratishthan

# विवाह सहाय्य

*हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी. बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक*

**क्र. ७१/२००३ वर** - संजय पांडुरंग जोशी, को.ब्रा., जन्म - २५.७.१९७०, गोत्र-शांडिल्य, उंची - ५'-८ ३/४'', सुदृढ बांधा, वर्ण - गोरा, शिक्षण - BFA, (बॅचलर ऑफ फाईन आर्टस् - जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्चा पदवीधर) कमर्शिअल आर्टिस्ट, स्वत:चा व्यवसाय - डिझाइनिंग, प्रिंटिंग, ग्रिटिंग कार्डस् वगैरे. गिफ्ट आर्टिकल्स. शिवाय विमा एजन्सी, मा. प्रा. रु. ६ ते ७ हजार, घरी आई-वडील (सेवानिवृत्त), एक मोठी बहीण विवाहित. **अपेक्षा** - पदवीधर, नोकरी करणारी, एकत्र कुटुंबात रहाणारी, अनुरूप, कोकणस्थ, पत्रिका पहाणे आहे. **संपर्क** - पांडुरंग वामन जोशी, 'शिवकृपा' शिवमंदिर पथ, जोशी चौक, रामनगर, डोंबिवली (पू.), ४२१२०१, फोन : २८६०४६१.

**क्र. ७२/२००३ वधू** - अनघा अशोक जोशी, को.ब्रा., गोत्र-शांडिल्य, जन्म - १०.७.१९७५, उंची - ५'-१'', B.Com., डोंबिवली येथे खाजगी कंपनीत नोकरी, मा. प्रा. रु. ३०००. आई वडील व विवाहित बहीण. **अपेक्षा** - कोकणस्थ, पदवीधर, उंची - ५'-५'' वर असावी, पुणे, नाशिक, चिपळुण, मुंबई चालेल. **संपर्क** - अशोक वामन जोशी, 'शिवकृपा', शिवमंदिर पथ, जोशी चौक, रामनगर, डोंबिवली (पू.), ४२१२०१, फोन : २८६१८८५.

**क्र. ७३/२००३ वर** - राजेश भास्कर मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - २६.५.१९७१, उंची - ५'-८'', शिक्षण - D.M.E., स्वत:चे इंजिनीयरिंग वर्कशॉप, मा. प्रा. रु. ६०००, वर्ण - सावळा, मुलाला आई वडिल व लहान भाऊ (अविवाहित) व आजी आहे. **अपेक्षा** - अनुरूप, ब्राह्मण, कोणत्याही पोटशाखेतील चालेल. **संपर्क** - भास्कर नारायण मराठे, घर नं. ११०, भांदुरगल्ली, बेळगांव - ५९०००२, फोन : २४०१०१४.

**क्र. ७४/२००३ वधू** - अश्विनी अशोक मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - १४.६.१९८१, उंची - ५'-२'', B.Com., वर्ण - गोरा, मध्यम बांधा, संगीताच्या ४ परीक्षा दिल्या आहेत. आई वडील व २ भाऊ अविवाहित. **अपेक्षा** - अनुरूप. **संपर्क** - अशोक वासुदेव मराठे, कालवी, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

**क्र. ७५/२००३ वधू** - मीनाक्षी सुरेश मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - ६.६.१९८०, उंची - ५'-२'', B.Com. गहुवर्ण, कॉम्प्युटर बेसिक कोर्स, सध्या C.A. कडे काम करीत आहे. **अपेक्षा** - उच्चशिक्षित, स्मार्ट, निर्व्यसनी, नोकरी अथवा व्यवसाय चालेल. **संपर्क** - रमेश त्रिंबक मराठे, 'सुरश्री', ९०५, वसंत नगर, साखळी, गोवा ४०३५०५, फोन : ०८३२-२३६५०४४.

**क्र. ७६/२००३ वधू** - स्वाती चिंतामणराव पाठक, जन्म - ११.९.१९७४, उंची - ५'-३'', वर्ण - गोरा, चष्मा नाही, M.A. (मराठी), विणकाम व एम्ब्रॉयडरीची आवड, आई वडील, एक अविवाहित भाऊ व एक विवाहित बहीण, **अपेक्षा** - पदवीधर, निर्व्यसनी, स्वत:चा व्यवसाय अथवा चांगली नोकरी, **संपर्क** - चिंतामणराव रघुनाथराव पाठक, शिक्षक कॉलनी, मु. पो. म्हसवड, ता. माण, जि. सातारा ४१५५०१, फोन : ०२३७३-२७०५९५

**क्र. ७७/२००३ वर** - नरसिंह चिंतामणराव पाठक, जन्म - ५.१२.१९७१, उंची - ५'-८'', वर्ण - सावळा, निर्व्यसनी, रक्तगट - O-ve, बी.एस्सी (इलेक्ट्रॉनिक्स) कॉम्प्युटर कोर्स, डिप्लोमा इन अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स, बी.पी.एड. ज्योतिष प्रवीण, स्वत:चा कॉम्प्युटर व्यवसाय व खाजगी क्लासेस, मा. प्रा. रु. १५ हजार, स्वत:चे दोन बंगले, २ एकर प्लॉटसाठी जागा, गावात १६ खण इमारत, आई वडील, एक बहीण विवाहित, एक अविवाहित, **अपेक्षा** - किमान पदवीधर, सुंदर, सुशील, गृहकृत्यदक्ष, **संपर्क** - चिंतामणराव रघुनाथराव पाठक, शिक्षक कॉलनी, मु. पो. म्हसवड, ता. माण, जि. सातारा ४१५५०१, फोन : ०२३७३-२७०५९५

**सौ. नीलांबरी रमेश (पृ.२८०), म. प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत आलेली स्थळे ७८/२००३ ते ८९/२००३.**

**क्र. ७८/२००३ वर** - प्रशांत अरविंद जोशी, को.ब्रा., जन्म - ३१.५.१९७४, गोत्र-शांडिल्य, उंची - ६'', वर्ण - सावळा, मध्यम बांधा, बारावीनंतर डायमेकरचा कोर्स, कॉम्प्युटर कोर्स, नोकरी - अजय विन्डकोर, खेड-शिवापूर, सुपरवायझर. उत्पन्न - ७०००, आई, वडील निवृत्त, आईचा शिवण क्लास व शिवण व्यवसाय, आजी आहे, भाऊ बहीण नाही, मुलावर कोणी अवलंबून नाही, मुलाचा स्वत:चा ४ रूमचा फ्लॅट आहे, आवड - ट्रेकिंग, **अपेक्षा** - कमीतकमी १२वी, कोणत्याही ब्राह्मण शाखेची, नोकरीची अट नाही, **संपर्क** - अरविंद अनंत जोशी, हिल-व्ह्यू प्लाझा, ब्लॉक नं. २०६, बालाजीनगर, पुणे ४३, धनकवडी, फोन : ४३७९५९४.

**क्र. ७९/२००३ वर** - अमोद अनिल मराठे, को.बा., जन्म - ९.९.१९७४, गोत्र - कपि, उंची - ५'-११'', मध्यम बांधा, रक्तगट - A+ve, मंगळ नाही, व्यंग नाही,

Marathe Pratishthan

बी.कॉम.एम.बी.ए. (टेलिकम्युनीकेशन मार्केटिंग) दिमाख कन्सल्टंटस् प्रायव्हेट लि. पुणे, मार्केटिंग मॅनेजर ६०००, आई वडील, लहान बहीण, कोणतीही जबाबदारी नाही, क्रिकेट व हॉकी खेळतो, **अपेक्षा** - नोकरी करणारी, कोकणस्थ/कऱ्हाडे, **संपर्क** - श्री. अनिल लक्ष्मण मराठे, ७० ब/४, आलोक, प्रभात रोड गल्ली नं. १५, सिंबायोसिस शाळेजवळ, पुणे ४११००४, फोन : ५६५१३२३.

**क्र. ८०/२००३ वर** - विद्याधर जोशी, को.ब्रा., जन्म - १८.१०.१९७४, उंची - ५'-८'', रक्तगट - B+ve, चष्मा आहे, BE (Mech) IBM (Software) लर्नेक इंडिया लि. अंधेरी, मुंबई, मा. प्रा. १५०००, आई वडील आहेत, वडील BOI आहेत, आई वडील पुण्यात पुढील पत्त्यावर व मुलगा मुंबईला असतो, **अपेक्षा** - अनुरूप, **संपर्क** - श्री. जयंत बाळ जोशी, १६३१/र, पुष्पमंगल हौ. सोसायटी, सदाशिव पेठ, टिळक रोड, गोपाळ गायन समाजाजवळ, पुणे ३०, फोन : ४३३२२५२.

**क्र. ८१/२००३ वर** - मुकुंद सखाराम पटवर्धन, को.बा., गोत्र - कौंडिण्य, जन्म - ९.९.१९६६, उंची - ५'-१०'', रक्तगट - O+ve, निमगोरा, व्यंग नाही, चष्मा नाही, SSC व्यवसाय - जनरल स्टोअर्स ÷ डेकोरेशनचा व्यवसाय, बिल्डींग मॉडेल, मा. प्रा. रु. ६०००. आई वडील व २ बहिणी आहेत त्यापैकी १ विवाहित, स्वत:चे घर आहे, मुलाला नाटकाची आवड आहे व कलाकार आहे, नाटकाचे दिग्दर्शन अभिनय करतो, अनेक राज्यस्तरीय पारितोषिके मिळाली आहेत, **अपेक्षा** - व्यवसायाला मदत करणारी, अनुरूप, **संपर्क** - श्री. स. का. पटवर्धन, ११०२ हरभट रोड, पेठभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) २३३१४४८.

**क्र. ८२/२००३ वर** - नरेश अच्युत जोशी, को.ब्रा., जन्म - २.३.१९७४, उंची - ५'-१०'', मध्यम गोरा, मंगळ नाही, कॉम्प्युटर इंजिनियर BE, खाजगी कंपनीत नोकरी - इंजिनियर, मा. प्रा. रु. ३५ ते ४० हजार, व्यंग - बोलताना थोडा काही वेळेस अडखळतो, काही वेळा सुरवातीला अडखळतो पण नंतर व्यवस्थित बोलू शकतो, आई व १ विवाहित भाऊ आहे, मोठा भाऊ स्वतंत्र राहातो, त्याच बिल्डींगमध्ये स्वत:चे घर आहे, मुलावर कोणतीही जबाबदारी नाही, **अपेक्षा** - उच्च शिक्षित, नोकरी करणारी, कोकणस्थ व पुण्यातील हवी, **संपर्क** - श्रीमती सुनिता अच्युत जोशी, रमणा गणपतीसमोर, महाराष्ट्र हौसिंग सोसायटी, M-३, लक्ष्मीनगर, पुणे ३७, फोन : ४४४१६८७.

**खुशीपत्र**

हितगुज जून २००३ चा अंक मिळाला. श्री. विठ्ठल महादेव (सांगली) व सौ. नीलांबरी रमेश (पुणे) यांनी वधूवर स्थळांची परिपूर्ण माहितीसह दिलेली यादी आपल्या बांधवांना निश्चितच उपयुक्त ठरेल. ''एकमेकां माहीती पुरवू अवघे बनू चिंतामुक्त'' अशा बाण्याने हे सहकार्य देणाऱ्या कुलबांधव-भगिनीस धन्यवाद.

- **भास्कर नरहरी** (पृ.४६) रत्नागिरी

**क्र. ८३/२००३ वर** - भालचंद्र शशिकांत जोशी, को.ब्रा., गोत्र - शांडिल्य, जन्म - १९.८.१९७०, उंची - ५'-२'', रक्तगट - O+ve, गोरा मध्यम, व्यंग नाही, SSC, टायपिंगच्या २ परीक्षा पास, एन. टी. विटेकर अकाऊन्टस् यांच्याकडे पगार २५००, घरी आई वडील व १ विवाहित बहीण, स्वत:चे ओनरशिप फ्लॅटचे घर, वडिलांचा पेपरचा उद्योग आहे, **अपेक्षा** - शिक्षण ९ ते १० चालेल, स्वत:चा छोटासा उद्योग करणारी व शक्यतो कोकणस्थ, **संपर्क** - शशिकांत लक्ष्मण जोशी, ५०१ नारायण पेठ, गणेश प्रसाद, ब्लॉक ७, पुणे ३०, द्वारा दंडगे फोन : ४४५९५०४.

**क्र. ८४/२००३ वधू** - किर्ती मधुसूदन पेंढारकर, कऱ्हाडे ब्राह्मण भारद्वाज, जन्म - १८.८.१९८०, उंची - ५'', वर्ण - गोरा, सडपातळ, मंगळ नाही, SYBCom. पास, T.Y. चालू, कॉम्प्युटर कोर्स, आई वडील, १ बहिण, १ भाऊ धाकटे, **अपेक्षा** - पदवीधर/डिप्लोमा नोकरी/व्यवसाय, कऱ्हाडे कोकणस्थ, शक्यतो पुण्यात राहाणारा, **संपर्क** - श्री. मधुसूदन नारायण पेंढारकर, मु. पो. कोर्ले, खारे पाटण, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग ४१६७०३.

**क्र. ८५/२००३ वर** - प्रसन्ना रामचंद्र संकपाळ, हिंदू मराठा, गोत्र - गार्ग्य, जन्म - ३.८.१९७८, उंची - ५'-३'', गहू वर्ण, रक्तगट - B+ve, व्यंग नाही, एम.ए. (मानसशास्त्र) नोकरी - शालेय मानसशास्त्रज्ञ, स्नेहदीप जनकल्याण फौंडेशन, पुणे, मा. प्रा. ३०००, आवड - वाचन, गायन व स्वयंपाक करणे, **अपेक्षा** - किमान पदवीधर, नोकरी ज्युनियर अधिकारी, उत्पन्न ४००० च्या वर असावे, जात शक्यतो मराठा, **संपर्क** - श्री. गणपती नारायण साखरे पवार (आजोळचा पत्ता), गणपती कृपा, मु. पो. लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी.

**क्र. ८६/२००३ वधू** - विनिता भास्कर भोगले, को.ब्रा., गोत्र - शांडिल्य, जन्म - १०.१.१९७९, उंची - ५'-३'', गोरी, मध्यम, रक्तगट - O+ve, BAMA होम सायन्स लायब्ररी Certificate Course, ब्युटीपार्लरचा कोर्स, व्यवसाय - ब्युटीपार्लरचे स्वतंत्र काम करते. घरी आई वडील, १ बहीण विवाहित, वडील ST मध्ये नोकरी करतात, **अपेक्षा** - कोकणस्थ, नोकरी वा व्यवसाय पण पदवीधर अथवा डिप्लोमाधारक, **संपर्क** - भास्कर विनायक भोगले, आनंद ब्राह्मण गल्ली, बेगमपुरा, औरंगाबाद ४३१००१, फोन : (०२४०) २४००२०५.

**क्र. ८७/२००३ वधू** - गायत्री माधव जोशी, दे. यजु. ब्रा., गोत्र - गौतम, जन्म - २७.३.१९८०, उंची - ५'', रक्तगट - O+ve, मध्यम गोरी, व्यंग नाही, शिक्षण M Phil पुणे विद्यापीठ इतिहास विभागात करत आहे, Aptech चा २ वर्षाचा कोर्स पूर्ण, पर्सनल ब्युटीपार्लरचा कोर्स, आई पुणे विद्यापीठात नोकरी करते, वडील निवृत्त, औंधला स्वत:चा फ्लॅट, भाऊ बहीण नाही, **अपेक्षा** - उच्चशिक्षित २५ ते २७ च्या दरम्यान नोकरी हवी, **संपर्क** - माधव काशिनाथ जोशी, ११ पौर्णिमा हौसिंग सोसायटी, दर्शन पार्क, डी. पी. रोड, औंध, पुणे ४११००७, फोन : ०२०-७२९८८८४.



Marathe Pratishthan

**क्र. ८८/२००३ वधू** - स्मिता आनंद जोशी, को.ब्रा., गोत्र - शांडिल्य, जन्म - ३.८.१९७९, उंची - ५'-२'', मध्यम बांधा, BSC BEd MSc पूर्ण व MSc IT चा कोर्स करत आहे, नोकरी नाही पण करण्याची तयारी, आई वडील, आजी आजोबा व एक लहान भाऊ, आई शिक्षिका, वडिलांचे स्वतंत्र मेडिकल स्टोअर्स, भाऊ कमर्शियल आर्ट औरंगाबाद येथे शिकत आहे, **अपेक्षा** - पदवीधर, चांगली नोकरी, निर्व्यसनी, ब्राह्मण, एकत्र कुटुंब पद्धती चालेल, **संपर्क** - श्री. आनंद हरीभाऊ जोशी, वेदांग बंगला, शिक्षक कॉलनी, आनंदनगर, नरहरी महाराज मंदिराजवळ, कन्याशाळा रस्ता, जिल्हा परिषद, परळी वैजनाथ, जिल्हा बीड पिन कोड - ४३१५१५, फोन : ९५२ ४४६२२२/७२.

**क्र. ८९/२००३ वधू** - निता शरद जोशी, को.ब्रा., गोत्र - शांडिल्य, जन्म - १४.७.१९८०, उंची - ५'', निमगोरी, सडसडीत, शिक्षण - १२वी नंतर, G D Art Commercial चा ५ वर्षाचा कोर्स पूर्ण (specialisation in DVT), नोकरी - निर्मिती अॅड एजन्सी (कोल्हापूर), मा. प्रा. रु. ३५००, आई, २ बहिणी विवाहित, भाऊ नाही, वडील नाहीत, ड्रॉईंग व लिखाणाची आवड, **अपेक्षा** - वयात ३-५ अंतर, शिक्षण पदवीधर अथवा डिप्लोमा होल्डर पाहिजे, पगार ८ ते १० हजार, व्यवसाय नोकरी पुणे येथे अथवा बाहेर चालेल, **संपर्क** - सौ. स्मिता अजित मराठे (बहीण), १६/१२६ महर्षी नगर, सौभाग्य मंगल कार्यालयाजवळ, पुणे ३७. ***

## गात्रे

सटवाई लिहून ठेवते गोष्टी वाईट आणि चांगल्या
**पण** - दैवाचा फेरा फिरतो तेव्हा,
हाती नसते आपल्या.
काळे आणि मोठे डोळे हेच खरं सौंदर्य.
**पण** - परमेशानं भरून ठेवलंय
त्यात अश्रुंचेच औदार्य.
तोंडात असते गोड वाणी आणि पदार्थाची चव.
**पण** - जेव्हा तेच तोंडसुख घेते
तेव्हा मात्र होते बेचव.
ताठ असावी मान नेहमी स्वाभिमानासाठी
**पण** - थोरांसमोर झुकवावी
नेहमीच आशीर्वादासाठी.
हृदय किंवा मन असावं प्रेमळ आणि विशाल
**पण** - न समजता देऊन बसलात
तर मात्र फसाल.
हात असावे बळकट, त्यांनी करावे दान खूप.
**पण** - कधीच ओढू नका त्याने
आपल्याच पोळीवर तूप.
पोट असते वीतभर पण दिवसभर कष्ट करवते
**पण** - आयुष्यात मानलेले समाधान
तेच सामावून घेते.
पाय असावे भक्कम कारण पायाच तो तुमचा
**पण** - तेच जर डगमगले तर
भरवसा नाही देहाचा.
देवानं दिलय आवश्यक तेवढच आपल्याला
**पण** - कष्ट करा खूप आणि
सुदृढ ठेवा स्वतःला

- **श्रीमता स्वाती अभ्यंकर** (विजय अनंत, पृ.१५५, यांची मुलगी), चिंचवड, पुणे

## *How children think of Daddy at different ages*

| | |
|---|---|
| At 4 years | My dad is great. |
| At 6 years | My dad knows everybody. |
| At 10 years | My dad is good but is short tempered. |
| At 12 years | My dad was very nice to me when I was young. |
| At 14 years | My dad is getting fastidious. |
| At 16 years | My dad is not in line with current times. |
| At 18 years | My dad is becoming cranky |
| At 20 years | It is becoming difficult to tolerate dad. I wonder how mother puts up with him. |
| At 25 years | Daddy is objecting to everything. |
| At 30 years | It is becoming difficult to manage my son/ daugher. I was so scared of my dad when I was young. |
| At 40 years | Dad has brought me up with so much discipline. Even I should do the same. |
| At 45 years | I am baffled as to how my dad brought us up. |
| At 50 years | My dad faced so many hardships to bring us up. I am unable to manage a single son. |
| At 55 years | My dad was so far-sighted and planned so many things for us. He is one of a kind and unique. |
| At 60 years | My dad is great. |

**Thus it takes 56 years to complete the cycle and come back to the original assesment.**

प्रेषक - **उदय दत्तात्रय** (पृ.३२६), मुलुंड, मुंबई

## केशवसुतांच्या नावे 'काव्यप्रसूतीऐवजी खरी प्रसूती'

मालगुंड येथे लाखो रुपये खर्च करून केशवसुतांचे छान स्मारक बांधले आहे. पण त्याचा आडगावी असल्यामुळे पुरेसा उपयोग होत नाही. आचार्य अत्रे, अनंत काणेकर हे पन्नास वर्षांपूर्वी मालगुंडला गेले असता, 'गावकऱ्यांनी केशवसुतांचे नावाने प्रसूतिगृह बांधावे', असे सुचविले होते. कारण लायब्ररी काढल्यास वाचण्यास तिथे कोणी पुरुष माणसेच विशेष नव्हती. सर्व मुंबईला कामधंद्यानिमित्त गेलेली. तेव्हा अत्र्यांनी नवयुगमध्ये 'केशवसुतांच्या नावे काव्यप्रसूतीच्या ऐवजी, खरी प्रसूती' असे शीर्षक असलेला लेख लिहिला होता.

केशवसुतांचे भव्य स्मारक रत्नागिरीस झाले असते, तर त्याचा चांगला उपयोग झाला असता.

- **गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर, मुंबई
(साभार : महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)

Marathe Pratishthan

## या अंकात


१. **सेल, फेस्टिवल ऑफर्स, फ्री गिफ्ट्स् यांना भुलू नका** पृ.१
सौ. राधा श्रीकांत मराठे, अंधेरी, मुंबई

२. **केबल भाडे केवळ ११० रुपये**................. पृ.२
सौ. राधा श्रीकांत मराठे, अंधेरी, मुंबई

३. **ग्राहकांसमोरच दागिने घडवणारी पेढी**........... पृ.३

४. **भारत - काल आणि आज**...................... पृ.४
विजय मराठे, पुणे

५. **कॅनेडियन हुज हू २००२ मधे डॉ. एकनाथ व्यंकटेश**.पृ.५
श्रीनिवास गोपाळ, पुणे

६. **दृष्टिभेट** (कविता)............................. पृ.५
मोरेश्वर हरि, गोंवा

७. **वार्धक्याविरुद्ध लढा** (उत्तरार्ध).................. पृ.६
डॉ. सौ. सीमा श्याम मराठे, पुणे

८. **जीवन म्हणजे नक्की काय ?**..................... पृ.६
चिंतामण महादेव, मुंबई (संग्राहक)

९. **कृतज्ञता अष्टादशक**............................ पृ.७
प्रभाकर सीताराम, मुंबई

१०. **अखिल भारतीय अधिवेशनासाठी पुणे शाखेतर्फे खास आमंत्रण, व्यक्तिगत माहितीसाठी प्रश्नावली आणि अधिवेशनाची कार्यक्रम पत्रिका**.......... पृ.८

११. **आण्णांनी मुलामुलींचे एकत्रित नाटक केले**......... पृ.१०
मनोज यशवंत, पुणे

१२. **सशांची देखभाल - मानसिक संतुलनासाठी !**...... पृ.१०
अच्युत महादेव चक्रदेव, पुणे

१३. **आम्ही मराठी दुकानदार**....................... पृ.११
विनायक केशव, मुंबई

१४. **सीतेचे हरण केले, ते कोणत्या झाडाला बांधले ?** पृ.१२
अनंत धोंडो खांबेटे, मुंबई

१५. **गात्रे** (कविता)............................... पृ.१५
श्रीमती स्वाती अभ्यंकर, पुणे

१६. **केशवसुतांच्या नावे 'काव्यप्रसूतीऐवजी खरी प्रसूती'** पृ.१५
गजानन भास्कर, मुंबई

१७. **How children think of Daddy at different ages** पृ.१५
उदय दत्तात्रय, मुंबई (प्रेषक)

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **अनुकरणीय** (पृ.२), **एकमेकां साह्य करू** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३), **Self Improvement** (पृ.४), **खुषीपत्रे** (पृ.७,९,१०,११,१४), आणि **विवाह सहाय्य** (पृ.१३ ते १५) ही नेहमीची सदरे.


बुक पोस्ट

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan